सोमवार, २३ ऑक्टोबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ७९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) MONDAY 23 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-79 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-10 • PRICE-5


# अन्यथा तीव्र उपोषण केले जाईल

## मनोज जरांगे पाटील : गावच्या सीमाही तुम्हाला शिवू देणार नाही



आधुनिक केसरी न्यूज

**जालना : गेल्या अनेक दिवसांपासून मराठा आरक्षणावरून महाराष्ट्रातील राजकारण तापले आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी राज्यात विविध ठिकाणी जाहीरसभा घेत आक्रमक भूमिका घेतली आहे. २४ ऑक्टोबरपर्यंत सरकारने मराठा समाजाला आरक्षण द्याव, अन्यथा तीव्र उपोषण केले जाईल, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. यावेळी त्यांनी आंदोलनाची पुढील रुपरेषा काय असेल? याचीही घोषणा केली आहे.**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून २५ ऑक्टोबरपासून आमरण उपोषण पुन्हा सुरू केले जाणार आहे. त्या उपोषणादरम्यान, कुठलेही औषधोपचार किंवा वैद्यकीय सेवा घेतली जाणार नाही. अन्न आणि पाण्याचाही त्याग केला जाईल. मराठा समाजाला न्याय मिळावा म्हणून २५ तारखेपासून एकदम कठोर उपोषण केले जाईल. तसेच मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सुटेपर्यंत आमच्या गावात कोणत्याही राजकीय नेत्याला येऊ दिले जाणार नाही. आरक्षण घेऊनच गावात यायच, नाहीतर आमच्या गावचा सीमाही तुम्हाला शिवू देणार नाही असा थेट इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. प्रत्येक सर्कलमधील सर्व गावाच्या वतीने एकाच ठिकाणी महाराष्ट्रभर ताकदीने साखळी उपोषण सुरू केले जाणार आहे. २८ तारखेपासून या साखळी उपोषणाचे आमरण उपोषणात रुपांतर होणार आहे. याची सर्कलनिहाय तयारी मराठा समाजाने केली आहे. सगळ्या गावांनी सर्कलच्या ठिकाणी किंवा मोठे गाव असेल तर त्याठिकाणी आसपासच्या गावातील सर्व लोकांनी एकत्र येत कायमस्वरुपी बसून राहायचे आहे, अशा सूचना मनोज जरांगे यांनी दिल्या आहेत. मनोज जरांगे पुढे म्हणाले, प्रत्येक तालुक्यात आणि गावात प्रचंड संख्येने मराठा समाजाने एकत्र येत सरकारला जागे करण्यासाठी कँडल मार्च काढायचा आहे. हे शांततेचे सुरू झालेले आंदोलन सरकारला झेपणार नाही. २५ ऑक्टोबरला पुन्हा आंदोलनाची नवी दिशा सांगणार आहे. मात्र सरकारने ही गोष्ट गांभीर्याने घ्यावी. हे आमरण उपोषण आणि सर्कलचे साखळी उपोषण महाराष्ट्रातील पाच कोटी मराठे चालवणार आहेत. सरकारने मराठा आरक्षणाचा प्रश्न २४ तारखेच्या आत मार्गी लावावा. २५ तारखेला पुन्हा आंदोलनाची दिशा सांगितली जाणार आहे. ती तुम्हाला पेलणारी नसेल. हे आंदोलन तुमच्यासाठी सोपे आहे, असे वाटेल पण हे आंदोलन सुरू झाल्यावर तुम्हाला झेपणार नाही.

मराठा आरक्षणासाठी १७ दिवस उपोषण करणारे मनोज जरांगे पाटील रविवारी बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. तसंच सरकारवरही ताशेरे ओढले. तुमच्या हातात दोन दिवस आहेत, मराठ्यांच्या नादाला लागू नका, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.
एक नवीन पिल्लु सकाळी आणलें. तुम्ही वेडे समजता का आम्हाला? ईडब्ल्यूएस कोणी मागितले? कोणाला फायदा झाला आहे? सांगा एखादं नाव. मग कशाला आकडे मोडता? तुम्ही गणितशास्त्राचे मास्तर होता का?" असा सवाल करत मनोज जरांगे पाटलांनी टीकास्त्र सोडले. सतत सांगायला लागलेत की ईडब्ल्यूएसचा फायदा झाला. बाकींच्यानाही सारथीसारख्या संस्था आहेत हे सांगितले का? ईडब्लूएस दाखवालयला लागलेत, तसेच इतरांनाही आरक्षण आहे. त्याची आकडेमोड केली का? नाही केली. मराठ्यांच्या आरक्षणाचा विषय की जाहिराती छापायला पैसे आमचे, अर्धा कॉलम छापून आणणार ते आणि आम्हाला सांगणार काय फायदा झाला? असेही जरांगे पाटील म्हणाले.
तसंच, आरक्षणाच्या मुद्द्यावरून सरकारने वेळकाढूपणा करू नये. सरकारने १ महिना मागितला आम्ही ४० दिवस दिले, असाही पुनरुच्चार त्यांनी केला.

महत्त्वाची बातमी

## बच्चू कडू करणार अयोध्या दौरा

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** प्रहारचे आमदार बच्चू कडू हे 29 ऑक्टोबर रोजी अयोध्येच्या दौऱ्यावर जाणार आहेत. याविषयीची माहिती बच्चू कडू यांनी माध्यमांशी बोलताना दिली. राज्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा प्रभू श्रीराम चरणी बच्चू कडू मांडणार आहे. त्यासाठी त्यांच्या अयोध्या दौऱ्याचं आयोजन करण्यात आले. सध्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आमदार बच्चू कडू यांनी आक्रमक पवित्रा घेतला असल्याचे चित्र आहे. तर अयोध्येला जाऊन शेतकऱ्यांसाठी प्रार्थना बच्चू कडू आणि त्यांचे कार्यकर्ते अयोध्येला जाऊन करणार आहेत. यावर बोलताना आमदार बच्चू कडू म्हणाले की, शेतकऱ्यांचे मरण होऊ नये म्हणून आम्ही प्रभू रामचंद्राचं दर्शन घेणार आहोत. तिथे ऊस, कापूस, तूर, सोयाबीन आणि धान आम्ही प्रसाद चढवणार. शेतकऱ्यांचे प्रश्न प्रथम स्तरावर या सरकारने घ्यावे म्हणून हा अयोध्या दौरा आहे. आम्ही आर्थिक आरक्षणाची लढाई लवकरच सुरु करु. त्यासाठी आम्ही संपूर्ण भारत फिरणार. शहिदांसाठी आणि शेतकऱ्यांसाठी आम्ही मेरा देश मेरा खून' राबवत आहोत. या देशाच्या स्वातंत्र्यासाठी हिंदू, मुस्लिम, दलित या सगळ्यानी बलिदान दिले. आम्ही हजारोंच्या संख्येने अयोध्येला जाणार आहोत. या सरकारला बुद्धी दे ही प्रार्थना आम्ही प्रभू श्रीरामाकडे करु. शेतकऱ्यांचा विचार करणार आणि त्यांच्या हिताचे सरकार यावे, असे मागण आम्ही तिकडे मागू. अयोध्येमधील शहिदांचे स्मारक व्हावे. यासाठी देखील आम्ही जात आहोत, असे बच्चू कडू म्हणाले.

# पॅलेस्टाईनच्या मदतीसाठी भारत सरसावला

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** गाझा पट्टीवरून हमास या दहशतवादी संघटनेने इस्रायलवर हल्ला केल्यानंतर इस्रायलकडून गाझा पट्टी सील करण्यात आली होती. तसंच, तिथं इंधन, पाण्यासह इतर मानवतावादी साहित्यांचीही नाकाबंदी करण्यात आली होती. त्यामुळे गाझा पट्टीत राहणाऱ्या नागरिकांचा जगण्याची संघर्ष सुरू होता. अखेर, शनिवारी इजिप्त आणि गाझा पट्टी दरम्यानची सीमा इस्रायलने दोन आठवड्यांनंतर खुली केली. त्यामुळे युद्धग्रस्त पॅलेस्टिनी नागरिकांसाठी अत्यंत आवश्यक अशा मदत सामुग्रीची वाहने गाझा पट्टीत दाखल झाली आहेत. आता, भारतानेही गाझा पट्टीतील पॅलेस्टाईन नागरिकांना मदत पाठवली आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी याबाबत या समाजमाध्यमावरून माहिती दिली. परराष्ट्र



मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची X वर म्हणाले की, पॅलेस्टाईन नागरिकांसाठी ६.५ टन वैद्यकीय साहित्य आणि ३२ टन आपत्ती निवारण साहित्य IAF C-17 या विमानाने रवाना करण्यात आली आहेत. हे विमान इजिप्तच्या EL-ARISH या विमानतळावर पोहोचेल. औषधे, शस्त्रक्रियेसाठी लागणारी साधने, तात्पुरत्या राहण्यासाठी तंबू, ताडपत्री, स्वच्छतेसाठी लागणाऱ्या वस्तू, जलशुद्धीकरण गोळ्यांसह विविध वस्तू पॅलेस्टाईन नागरिकांसाठी पाठवण्यात आल्या आहेत. इंधनासह सर्व साहित्यांच्या गाड्यांना सीमेवरच अडवण्यात आल्याने गाझातील नागरिकांची कोंडी झाली होती. तेथील पॅलेस्टाईन नागरिकांचा जीवन-मरणाशी संघर्ष सुरू होता. गाझा पट्टी आणि इजिप्तमधील सीमेवर आधीपासूनच संयुक्त राष्ट्राने पाठवलेल्या सुमारे तीन हजार टन मदतसामुग्रीचे ट्रक उभे होते. शनिवारी ही सीमा खुली झाल्यावर हे ट्रक गाझाच्या दिशेने निघाले. सध्याच्या युद्धग्रस्त गाझातून सुटका करून घेण्यासाठी हजारो नागरिक इजिप्तमध्ये जाण्याच्या प्रतीक्षेत सीमेवर आहेत. मदत सामुग्रीच्या २० वाहनांना प्रथम इजिप्त सीमेवरून इस्रायलने वेढा दिलेल्या गाझा पट्टीत प्रवेश देण्यात आला असून या वाहनांमध्ये जीवरक्षक साहित्याचा समावेश असल्याचे संयुक्त राष्ट्रांनी म्हटले आहे.

# जखमी व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू

## रायखेडा गावाजवळील घटना

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी.रामपूरकर**

**जिंतूर :** जालना महामार्गावरील रायखेडा गावाजवळ वरुड नृ येथील जखमी अवस्थेत आढळलेल्या व्यक्तीचा परभणी येथे उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याची घटना 20 ऑक्टोबर रोजी सायंकाळी 7 वाजेच्या सुमारास घडली. याबाबत अधिक माहिती अशी की,जिंतूर जालना महामार्गावरील रायखेडा गावाजवळ एक अज्ञात व्यक्ती जखमी अवस्थेत पडलेला होता दरम्यान यावेळी संभाजीनगर येथून जिंतूरकडे येत असताना संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर यांच्या सदरील इसम जखमी अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले यावेळी त्यांनी तत्काळ गाडी थांबवून जखमी व्यक्तीला नागरिकांचा मदतीने स्वतःच्या गाडीत टाकून जिंतूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले यावेळी ओळख पटविण्यासाठी सदरील जखमी व्यक्तीचा फोटो सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हायरल करून ओळख पाठविण्यात आली सदरील व्यक्ती जिंतूर तालुक्यातील वरुड नृसिंह येथील रहिवासी विष्णू आश्रोबा शिंदे असल्याचे समजले यावेळी डॉ अजमल यांनी प्रथमोपचार करून प्रकृती चिंताजनक असल्यामुळे त्यास परभणी येथील रुग्णालयात पाठवण्यात आले होते यावेळी रात्री उशिरा उपचारा दरम्यान मृत्यू झाला असल्याचे नातेवाईकांनी सांगितले आहे.

# रावण दहन प्रथेवर बंदी घाला : अमोल मिटकरींची मागणी


## अकोल्यात रावण मंदिराचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

अकोला : राज्यात रावण दहनाच्या प्रथेवर बंदी आणण्याची मागणी राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे प्रवक्ते आमदार अमोल मिटकरींनी सरकारकडे केली आहे. आगामी हिवाळी अधिवेशनात यासंदर्भात सभागृहात आवाज उठवणार असल्याचं आमदार अमोल मिटकरी यांनी सांगितले. आमदार मिटकरींच्या मागणीनंतर या विषयावरून नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहेत. सध्या राज्यात आदिवासी संघटनांचा रावण दहनाला विरोध आहे.
राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार, प्रवक्ते अमोल मिटकरींनी आज अकोला जिल्ह्यातील सांगोळा गावाला भेट दिली. या गावात रावण मंदिराच्या उभारणीसाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी आपल्या आमदार निधीतून सांगोळ्यातील सभागृह बांधकामासाठी दिलेल्या 20 लाखांच्या निधीच्या कामाचं भूमिपूजन केलंय. सांगोळा गावात 350 वर्ष जुनी रावणाची मूर्ती आहे. या संपूर्ण गाव दसऱ्याच्या दिवशी रावणाची पूजा करण्यात येते.
भूमिपूजनानंतर अमोल मिटकरी यांनी म्हटले की, रावण हे आदिवासींचे दैवत असेल तर रावण दहन कशाला, आदिवासी बांधवांची भावना रावणासोबत असेल तर रावण दहनाला बंदी घातली पाहिजे. लंकेचा राजा आणि शिवभक्त असलेल्या रावणाच्या पुतळ्याचे दहन कशाला? आम्ही रामाची पूजा करतो, पण रावणाचे दहन कशाला असा सवाल त्यांनी केला. रावण दहनावर बंदी घालण्यासाठी आपण विधीमंडळात आवाज उठवणार



असल्याचे त्यांनी सांगितले. भारतातील काही आदिवासी समुदायांमध्ये रावणाची पूजा केली जाते. भंडारा जिल्ह्यातील काही आदिवासी संघटनांनी रावण दहनावर बंदी घालण्याची मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली होती. त्यानंतर भंडारा जिल्ह्यात रावण दहनास मनाई करण्यात आली आहे.
अन्याय, अहंकारी, पापी वृत्तीचे प्रतिक म्हणून रावणाचे दहन करण्यात येते. विजयादशमीच्या दिवशी प्रभू श्रीरामचंद्रांनी रावणाचा वध केला असल्याची आख्यायिका आहे. त्यानुसार देशभरात हिंदू धर्मीय रावण दहनाचे कार्यक्रम आयोजित करतात. मात्र, मागील काही वर्षांपासून आदिवासी संघटनांकडून याला विरोध केला जात आहे. भंडारा जिल्ह्यात यावर्षी आदिवासी समाज बांधवांनी या रावण दहनला प्रचंड विरोध केला आहे. रावण दहन केल्यास अनुसूचित जमाती समाजाच्या वतीनं आक्रोश मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा प्रशासनाला देण्यात आला आहे. अखिल भारतीय आदिवासी परिषद, ऑल इंडिया आदिवासी पीपल्स फेडरेशनच्या वतीनं तसं पत्र भंडारा जिल्हा प्रशासनाला दिलं आहे.
या पत्राच्या अनुषंगाने भंडाऱ्याच्या अतिरिक्त जिल्हा न्याय दंडाधिकारी लीना फालके यांनी एक आदेश बजावला आहे. या आदेशानुसार आदिवासी महात्मा राजा रावण यांच्या पुतळ्याचे दसऱ्याच्या दिवशी दहन करणाऱ्या व्यक्ती किंवा मंडळावर गुन्हे दाखल करावे, असं या आदेशात नमूद आहे. सध्या हे पत्र समाज माध्यमावर प्रचंड प्रमाणात व्हायरल होत आहे. मात्र, याबाबत फालके यांचे दोन पत्र व्हायरल होत आहे. दुसऱ्या पत्रात कोणताही आदेश नमूद नाही.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

किंवा स्वर्ग आणि पृथ्वी यांचं ऐश्वर्य जर एकाच वेळी एकत्र हवं असेल तर प्रियमित्रा, तू शाकुंतलाचा आस्वाद घे.' मला वाटतं हेच उद्गार सर्व ग्रंथांना लागू होतात. ज्ञानेश्वर माऊलींची माफी मागून त्यांच्या भाषेत मला असे सांगावेसे वाटते ग्रंथ सर्व रसांचा आगरु, ग्रंथ सर्व सुखांचा सागरु तरी ग्रंथ हाती घेईजे, मग सर्व सुखाते पात्र होईजे.

जशी प्रेशर कुकरमध्ये कोंडलेली वाफ बाहेर पडणे आवश्यक असते त्याचप्रमाणे आपल्या मनात साठलेल्या भावनांचे सुद्धा मुक्त होणे, निचरा होणे किंवा ज्याला आपण विरेचन असे म्हणू तेही आवश्यकच असते. पुस्तके आणि त्यांचे वाचन अशा प्रकारचे भावनांचे विरेचन ज्याला इंग्रजीत कॅथर्सिस म्हटले जाते ते घडवून आणतात. मी वाचकही आहे आणि लेखकही. माझा तर श्वास म्हणजे वाचन ! मी जेव्हा आनंदी असतो तेव्हा एखादे आवडते पुस्तक हातात घेतो आणि माझा आनंद दुणावतो. मी जेव्हा दुःखात असतो तेव्हाही एखादे पुस्तक हातात घेतो आणि माझे दुःख उणावते. थोडक्यात म्हणजे गणपतीच्या आरतीत म्हटल्याप्रमाणे चांगल्या पुस्तकांचे वाचन हे 'सुखकर्ता दुःखहर्ता' अशा प्रकारचे आहे. स्वानंदासाठी वाचन करावे, विचार, अनुभव आणि भावना समृद्ध होण्यासाठी वाचन करावे. 'मेरा पढने में नही लागे दिल...' असे न म्हणता 'मेरा पढनेमेहीं लागे दिल' असे म्हणू या.

# आँखोंसे जो उतरी हैं दिलमें...





# आनंदी पहाट

## संस्कृतीचा वारसा आपल्या प्रकृतीद्वारे दिसावा

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सामाजिक बांधिलकीची जाणीव बालपणापासूनच लहान मुलांमध्ये निर्माण करणं जरुरीचं असतं, त्याचं भान त्यांच्याकडून राखलं जातं का ? हे पाहणं गरजेचं असतं. आजची लहान मुलंच ह्या देशासाठी उद्याची संपत्ती असल्याचं आपण बोलतो, ऐकतो; त्यानुषंगाने मुलांचा विकास झाला तरंच राष्ट्राची प्रगती होईल. त्या प्रगतीच्या दृष्टीने सामाजिक उणिवा दूर करून, समाजातल्या प्रत्येक घटकांच्या जाणीवा जपणं आवश्यक आहे. अलीकडच्या काही दिवसांपासून कुटुंबविघटनानंतर आता व्यक्ती विघटन व्हायला लागलं आहे. समाजाशी आपली नाळ जोडलेली असणं आवश्यक असतं, आपलं एक निराळं नातं इतर प्रत्येकाशी निर्माण झालेलं असणं गरजेचं असतं. बालपणापासूनच सामाजिक जिव्हाळ्याची सवय झाली कि पुढील आयुष्यांत समाजाप्रती आपलं कर्तव्य म्हणून जबाबदारीने सामाजिक घटकांच्या उणिवा दूर करण्यात आपला मोलाचा वाटा असू शकतो. लहान मुलांना निश्चितच तळहातावरील फोडासारखं वाढवायचं असतं. त्याच अनुषंगाने त्यांचं संगोपन, पालनपोषण करायचं असतं. व्यक्ती तितक्या प्रकृती ह्या उक्तीप्रमाणे आणि निसर्ग नियमानुसार प्रत्येक बाळाची शारीरिक जडणघडण भिन्न असते. त्यांतही मुलगा आणि मुलगी हा जरी भेदभाव करायचा नसला तरीही त्यांना वाढवताना त्यांच्या शरीरांतर्गत होणारे बदल हे वेळीच विचारांत घ्यावे लागत असतात. त्या बदलांचा थेट परिणाम सर्वप्रथम त्यांच्या मानसिकतेवर होत असल्याचं आपल्या वेळोवेळी लक्षात आलंच पाहिजे. बालपणाशी संबंधित आपण आपला थोडा दृष्टीकोन बदलण्याची सद्यःस्थितीत नितांत गरज आहे. आपल्या सकारात्मक विचारांमुळे लहानपणातलं बालपण टिकवून ठेवणं आपल्याच विचार, वर्तन आणि व्यवहारांत आहे.



आधुनिक केसरी

## शाश्वत जाणावा | एक हरि ||

कैसी धावाधाव | फुका करी जीवा ||
मायेचा चकवा | संसारात ||१||
गुळाचिया ढेपी | मुंगळ्यांची रांग ||
धनिकांचा संग | स्वार्थ करी ||२||
पैशाच्या भोवती | भाटांचे कुंपन ||
गोंडा घोळी श्वान | रात्रंदिन ||३||
आप्त ईष्ट सारे| सुखाचे सोबती ||
दुःखाचे सांगाती | अनाथचि ||४||
अशाश्वता पाठी | नको धावू जीवा ||
शाश्वत जाणावा | एक हरि ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरूपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

ते दुर्गंधी नेघवे ॥२०॥ डोळां निघती चिपडें । नाकीं दाटतीं मेकडें ।प्रातःकाळीं घाणी पडे । मुखीं मळासारिखी ॥२१॥ लाळ थुंका आणी मळ ।पीत श्लेष्मा प्रबळ ।तयास म्हणती मुखकमळ ।चंद्रासारिखें ॥२२॥ मुख ऐसें कुश्चीळ दिसे ।पोटीं विष्ठा भरली असे ।

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

अन्तिम क्षिति उपलब्ध में, जिवन्मुक्त पद होय। तामे कोई एक आप्त है, मत द्रष्टा ऋषि सोय ।।१९।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल तृतीय अध्याय) ०२/०३/१९मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : योगाच्या अंतिम भूमीची प्राप्ती झाल्यावर योगी जीवन्मुक्त पद प्राप्त करतो. त्या जीवन्मुक्त योग्यांमधे कोणी एक आप्त योगीश्वर असतो, ज्याच्या अंतरात ईश्वरीय ज्ञानाचा स्त्रोत प्रवाहित होतो, ज्यांना वैदिक परिभाषेत मंत्रद्रष्टा ऋषि म्हणतात.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# शारदीय नवरात्र (माळ सहावी)

आधुनिक केसरी

देवी मातेची आयुधे भगवान शंकरांनी आपल्या शस्त्रसंभारातून देवी मातेला त्रिशूळ दिला. श्री, विष्णुंनी आपल्या चक्रातील काही तेज काढून एक नवीन चक्र तयार करून दिले. वरूण देवाने शंख दिला. अग्निने एक अजिंक्य व अचूक मारा करणारी दिव्य शक्ती दिली. पवन( वारा ) ने धनुष्यबाण दिले. इंद्र देवाने आपल्या बाणातील एक तेजस्वी बाण दिला. रणगर्जनेसाठी आपल्या ऐरावत हत्तीच्या गळ्यातील घंटा देवीला दिली. यमाने कालदण्डामधून ( काठी ) दण्डं वरूणाने पाशांकुश ( फास ) दिला. प्रजापतीने स्पटिकाची माळ दिली. ब्रम्हदेवाने देवीला कमंडलू दिला. सुर्याने देवीच्या त्वचेतील रोम छिद्रात आपली प्रकाश किरणे पसरवून तेज निर्माण केले.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

काळाने एक अजिंक्य तलवार व ढाल दिली. समुद्राने( क्षीरसागर ) दिव्य हार चूडामणी ,हातात रत्नजडित कांकणं आणि कानातील रत्नांनी जडवलेली कुंडले दिली. आभूषणामूळे रत्नांनी सजवलेली चंद्रकोर सर्व हातांना शुभ्र केयूर व पायात पवित्र नूपूरांची जोडी गळ्यात कंठा,मणिमाला प्रदान केल्या. साक्षात विश्वकर्माने हाताच्या सर्व बोटांना रत्नांनी मढवलेल्या सर्व अंगठ्या दिल्या.त्याच बरोबर एक अत्यंत धारदार फरशी दिली. बहुविध शस्त्रास्त्रे,अभेद्य कवच, कधीच कोमेजलेल्या न जाणा-या कमलपुष्पांच्या माला गळ्याची शोभा वाढवत होत्या त्याच्या सुगंधाने आसमंत दरवळून जात होता. सागराने विस्तीर्ण अत्यंत मनोहर व शोभिवंत पद्मपुष्पांचा हार दिला. हिमालयाने वाहन म्हणून अत्यंत उमदा सिंह व विविध रत्ने देवीला अर्पण केली. शेषनाग राजाने बहुमूल्य पृथ्वीमोलाचा नागहार देवीच्या चरणांवर अर्पण केला. सर्व देवतांनी आपल्या जवळची अत्यंत दुर्मिळ अशी रत्नभूषणे देऊन देवीचा सन्मान केला. अशी शस्त्रसंभार व रत्न अलंकार घातलेली देवीचे मातेचे लावण्यवती रूप पाहिल्यावर सर्व देवगणांनी देवी जगदंबेचा जयजयकार केला. आई राजा उदो उदो आई राजा उदो उदो.

# रूपाची ओळख नामानेच होते

आधुनिक केसरी

नुसत्या शास्त्रपठणामुळे होणाऱ्या ज्ञानापेक्षा भक्ती ही नक्कीच श्रेष्ठ आहे. भक्ती म्हणजे परमात्मस्वरूपाचे परमप्रेम होय. कर्म, ज्ञान, योग ही साधने असून भक्ती हे साध्य आहे. कर्ममार्गामध्ये, नुसते कर्म बरोबर करण्याच्या हिशेबात मन अडकून जाते; म्हणून नुसता कर्ममार्गी कर्मठ आणि जड बनतो आणि त्याला भगवंताचा विसर पडतो. योगामध्ये वृत्तींना आवरून धरण्याची खटपट करावी लागते. वृत्ती शांत झाल्या म्हणजे मन शून्याकार होते. वृत्ती आवरणाऱ्याला भगवंताचे प्रेम असेलच असे सांगता येत नाही. ज्ञानमार्गामध्ये आत्मानात्मविचाराला प्राधान्य असल्याने तिथे बुद्धीच्या सामर्थ्यावर फार भर असतो. पण मायेचा जोर फार विलक्षण असल्यामुळे, साधकाला ती केव्हा फसवील याचा नेम नसतो. ज्ञानमार्ग फार कठीण आहे. ज्ञानमार्गी माणसाला अभिमानाची बाधा लवकर होते. माझे मतच तेवढे खरे असे तो धरून चालतो. ज्ञानी मनुष्य जगताला मायाकार्य मानतो; म्हणजेच जगत मिथ्या आहे असे तो समजतो.



परमात्मा जर सर्वव्यापी आहे, तर हे जगत त्याच्यामध्येच असले पाहीजे, म्हणून भक्त या सृष्टीला मिथ्या न मानता भगवंताची लीला समजतो. त्याला या सृष्टीमध्ये सर्व ठिकाणी भगवंताचा महिमा, त्याचे विभूतिमत्व, आणि त्याचा आनंद भरलेला दिसून येतो. सृष्टीमधले सौंदर्य, माधुर्य, मनोहर भाव, पावित्र्य आणि प्रेम पाहून जीव मोहित होतो. पण सृष्टीमधल्या विभूतिरूपांची उपासना करून जीवाची तृप्ती होत नाही, कारण विभूती हे साक्षात् भाव नाहीत. म्हणून भगवंताच्या साक्षात् गुणांची आणि भावांची जरूरी लागते. त्यांच्या प्राप्तीने जीवाची तृप्ती होते. मात्र सौंदर्याने आणि माधुर्याने भरलेले हे भगवंताचे रूप आहे हे समजायला त्याला भगवंताचे नाम देणे जरूर आहे. कारण त्या रूपाला भगवंताचे नाम दिले नसेल तर ते रूप मायावी राक्षसाचे देखील ठरेल. कुंभाराने एकाच मातीपासून अनेक प्रकारची भांडी तयार केली; प्रत्येक भांड्यात मातीशिवाय दुसरे काहीच नाही, तरी प्रत्येक भांड्याचे नाव निराळे ! तुकारामबुवा एवढे मोठे संत बनले, पण भगवंत सर्व ठिकाणी व्यापून आहे म्हणून ते विठोबाला 'राम' म्हणाले नाहीत, किंव दत्ताला 'महादेव' म्हणाले नाहीत. जगत् हे भगवंतापासून भिन्न नाही. जगतात आढळणारी सर्व रूपे भगवंताची आहेत, पण रूपाची ओळखण नामानेच होते. प्रत्यक्ष आकाराला आलेली अनेक रूपे नाहीशी झाली तरी त्यांचे नाव टिकून राहाते. म्हणजे नाम हे देशकालाच्या मर्यादेपलीकडे असते. म्हणून ते रूपापेक्षा जास्त सत्य होय; आणि जे सत्य आहे, ते श्रेष्ठ असलेच पाहिजे. सत्य वस्तू ओळखणे हाच परमार्थ होय.

# गहिनीनाथ

नांवें ठेवून तेथें यवन पुजारी ठेविले. कल्याण कलयुगीं बाबाचैतन्य यांची समाधि होती, पण तें नांव बदलून राववागशर असें नांव ठेविलें. गोरक्ष आपल्या आश्रमीं सटव्यांस ठेवून तीर्थयात्रेस गेला. नवनाथ बहुत दिवसपर्यंत तीर्थयात्रा करित होते. **क्रमशः**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
सोमवार, २३ ऑक्टोबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# मुंबई लोकलचे वेळापत्रक कोलमडले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबईकरांची प्रवासवाहिनी म्हणून ओळखली जाणाऱ्या मुंबई लोकलचे वेळापत्रक पुन्हा एकदा कोलमडले. चर्चगेटहून बोरिवलीला जाणाऱ्या लोकलचे कपलिंग तुटल्याने पश्चिम रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली होती. परिणामी ही लोकल आता कारशेडला रवाना करण्यात आल्याची माहिती पश्चिम रेल्वेच्या वरिष्ठ जनसंपर्क अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे. एएनआयने यासंदर्भातील वृत्त दिले आहे.

देखभाल दुरुस्तीसाठी दर रविवारी मेगाब्लॉक घेण्यात येतो. आज (२२ ऑक्टोबर) गोरेगाव ते बोरिवली दरम्यान जलद अप आणि डाऊन मार्गावर सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत मेगा ब्लॉक घोषित करण्यात आला आहे. त्यामुळे अप आणि डाऊन जलद मार्गावरील लोकल धीम्या मार्गावर वळण्यात आल्या आहेत. परिणामी लोकल सेवेला फटका बसला आहे. तर, दुसरीकडे चर्चगेटहून बोरिवलीकडे जाणारी लोकल मरिन लाईन्सला येताच नादुरुस्त झाली. या लोकलची कलपिंग तुटल्याने मागच्या डब्यांशी लोकलचा संपर्क तुटला. परिणामी ही लोकल स्थानकावरच उभी राहिली. कपलिंग तुटल्यानंतर जवळपास पाऊण ते तासभर ही लोकल मरिन लाईन्सवर उभी राहिल्याने मागून येणाऱ्या गाड्यांच्या वेळपत्रकाला फटका बसला. परंतु, लोकल खोळंबून राहू नयेत म्हणून डाऊन मार्गावरची वाहतूक अप मार्गावरून पुढे नेण्यात आली आहे. तसंच, काही वेळानंतर नादुरुस्त झालेली लोकलही कारशेडला रवाना करण्यात आली. सकाळी ११.०२ मिनिटांनी लोकलचा तिसरा डबा इतर डब्यांपासून वेगळा झाला. मरिन लाईन्स स्थानकात ट्रेन येत असतानाच हा अपघात घडला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. तसंच, प्रवाशांनाही तत्काळ लोकलबाहेर काढण्यात आले. तसंच, लोकल कारशेडला रवाना करण्यात आली आहे, अशी माहिती पश्चिम रेल्वेच्या वरिष्ठ जनसंपर्क अधिकाऱ्यांनी दिली. एएनआय या वृत्तसंस्थेने ही माहिती समाजमाध्यमावर दिल्यानंतर अनेक नेटिझन्सने त्यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. रेल्वे गाड्यांचे सर्व्हिसिंग व्यवस्थित होत नसल्याचं एका युजरने म्हटले आहे.



एडिशनल कमिशनर समीर वानखेडे साहेब यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना पत्रकार वसंत खडसे, तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती.

# लोणार धारतीर्थ कायमस्वरूपी स्नानासाठी खुली करा

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बुलढाणा जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांनी लोणार येथील धारतीर्थावर श्रद्धास्नान करून सविनय कायदेभंग करू असा इशारा दिला होता. दि.२१/१०/२०२३ रोजी बछीरे यांनी धारतीर्थावर श्रद्धास्नान करून सविनय कायदेभंग करून स्नानास बंदीचा बोर्ड हटविला. त्यांच्या विरोधात १८७,१८८,४४७, १३५ कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.या ठिकाणी महाराष्ट्रतून नव्हे तर देशातून श्रद्धाळू येतात, लोणारचे धारातीर्थ हे पुरातत्त्व विभागाच्या मालकी हक्काचे नसून हे गंगा भोगावती नावाने महसूल विभागाच्या नोंदीमध्ये आहे. लोणार येथील विरज धारतीर्था विषयी निकाल सन १९४४ य.मा. काळे यांनी दाखल केलेल्या याचिका क्रमांक ४८४ नुसार माननीय उच्च न्यायालयाने दिलेला आहे त्या आदेशामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, "सदरील धारातीर्थ हे हिंदूंच्या मालकीचेच प्राचीन तीर्थस्थान आहे" असे असतानाही पुरातत्व विभाग माननीय उच्च न्यायालयाचा अवमान करून तीर्थ स्नानासाठी बंद केले आहे जर तीर्थक्षेत्र आणि पर्यटन हे पर्यटकांच्या येण्या जाण्याने झिजत असतील तर आग्राचे ताजमहल, दिल्लीचा लाल किल्ला, अजिंठयाची लेणी, एलोरा येथील कैलास लेणे, बनारस चे काशीतीर्थ, अयोध्याचे नवनिर्मित राम मंदिर, बद्रीनाथ, केदारनाथ सहित सर्व तीर्थक्षेत्र बंद करा आणि त्यानंतरच लोणारचे पावन विरजधारातीर्थ बंद करण्याविषयी विचार करा.



धारतीर्थाचे श्रद्धास्थान हे आमच्या हिंदू धर्मासाठी फार महत्त्वाचे व पवित्र मानले जाते व आम्ही स्वातंत्र्य हिंदू देशात राहतो का यमन देशात राहतो असा प्रश्न उपस्थित होत आहे असे यावेळी ते म्हणाले. जर धारतिर्थ कायमसुरुपी स्नानासाठी खुली नाही ठेवली तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व लोणार पंचकृषीतिल सामान्य नागरिकांनी तीव्र आंदोलन करू "जसे भारताच्या स्वातंत्र्यासाठी जे गांधीजींनी केले तसेच धारतीर्थाच्या स्वातंत्र्यासाठी आम्ही लढू आंदोलन करु असे यावेळी ते म्हणाले बुलढाणा जिल्हा संघटक डॉ.गोपाल बच्छिरे यांनी शिवसेना नेते खासदार अरविंद सावंत, बुलढाणा जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर, बुलढाणा जिल्हाप्रमुख श्री जालिंदर बुधवत, बुलढाणा जिल्हा उपप्रमुख प्रा.अशिषभाऊ रहाटे यांच्या नेतृत्वात डॉ. बछिरे यांनी सविनय कायदेभंग करून धारातीर्थ काही तासांसाठी स्वतंत्र केले"पुन्हा पुरातत्व विभागाने स्नान बंदी घातली.

याप्रसंगी शिवसेना उ.बा.ठा.चे नेते अड दीपक मापारी गजानन जाधव सर, श्याम राऊत, किसन आघाव, कैलास अंभोरे,श्रीकांत नागरे, जीवन घायाळ, तानाजी मापारी, सुदन अंभोरे, श्रीकांत मादनकर, इकबाल कुरेशी, गोपाल मापारी सह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

काल सविनय कायदेभंग केल्या प्रकरणी माझ्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आज एक दिवसीय आत्मक्लेश आंदोलन करण्यात आले . धारतिर्थ स्नानासाठी बंद करणे हे बेकायदेशीर असून पुरातत्व विभागाकडे कोणताही जीआर नाही .स्नानासाठी बंदी करणे योग्य नाही .बंदी न हटवल्या आम्हाला शेवटी न्यायालयाचे दरवाजे खटखटावे लागतील .
**डॉ .गोपाल बछीरे, जिल्हा संघटक शिवसेना उबाठा गट**



# महाविकास आघाडीविरोधात भाजपचे फुलंब्रीत आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** महाविकास आघाडी कंत्राटी भरतीचा शासन निर्णय काढून त्याचे खापर सत्ताधारी पक्षावर फोडत आहे. परंतु कंत्राटी भरतीचा हा शासन निर्णय महाविकास आघाडीचाच आहे, असा आरोप जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ यांनी केला. भारतीय जनता पक्षाच्या वतीने फुलंब्री शहरातील महात्मा फुले चौकात जोरदार निदर्शने करीत घोषणाबाजी शनिवारी करण्यात आली. या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष सांडू जाधव, भाजपच्या जिल्हा सरचिटणीस ऐश्वर्या अभिषेक गाडेकर, अल्पसंख्याकचे जिल्हाध्यक्ष इलियास शहा, जिल्हा उपाध्यक्ष सविता फुके, जिल्हा उपाध्यक्ष सर्जेराव मेटे, माजी जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र जैस्वाल, शिवाजी पाथ्रीकर, राजेंद्र काळे, भाजप शहराध्यक्ष योगेश मिसाळ, सरचिटणीस गोपाळ वाघ, किसन मोर्चाचे तालुकाध्यक्ष राजू तुपे, कलीम पटेल, महिला अध्यक्ष सविता नवले, सोशल मीडिया तालुका अध्यक्ष समाधान पाटील नवले,सुशीला फुके, कृष्णा गावंडे ओबीसी तालुकाध्यक्ष कैलास गायके, राम बनसोड, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष गणेश तांबे उपस्थित होते.



# अल्टिमेटम संपणार

आधुनिक केसरी

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला ४० दिवसांचा अल्टिमेटम दिला होता. हा अल्टिमेटम २४ ऑक्टोबरला संपणार आहे. त्यामुळे २४ तारखेला सरकार मराठा समाजाला आरक्षण जाहीर करते का याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. दरम्यान, यावरून मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमाशी संवाद साधला. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, २४ तारखेपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळेल अशी आशा आहे. सरकार २४ तारखेला आम्हाला आरक्षण देणार. आम्ही मुख्यमंत्र्यांच्या शब्दांचा मान राखून त्यांचा सन्मान केला आहे. आता त्यांनी त्यांच्या शब्दाचा मान राखून आमचा सन्मान करावा. गाफिलपणे राहून मराठा समाजाचा अवमान करू नये, असे मनोज जरांगे म्हणाले. मराठा आरक्षण समितीने अजून दोन महिन्यांचा अवधी मागितली आहे. हा दोन महिन्यांचा अवधी देणार का? असा प्रश्न जरांगे पाटलांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, समितीने कितीही वेळ मागुद्यात. पण सरकार आणि मुख्यमंत्री वेळ वाढवून देणार नाहीत. मुख्यमंत्री २४ तारखेला आरक्षण देणारच. तीस दिवसांऐवजी ४० दिवसांचा अवधी देऊन मुख्यमंत्र्यांचा सन्मान केला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री मराठा समाजाला कधीच दगाफटका करणार नाहीत. महाराष्ट्रातील समाजाला आणि तरुणांना मी विनंती करतो की मरण्यापेक्षा लढा. आत्महत्या करायची नाही. आत्महत्या करून स्वतःचं कुटुंब उघड्यावर पडायला लागली आहेत. एकानेही आत्महत्या करायची नाही. महाराष्ट्रातील मराठा समाजाने घराघरात सांगा की आत्महत्या कोणी करायची नाही. तुम्ही आत्महत्या केली तर आरक्षण कोणाला द्यायचे? त्यापेक्षा लढा ना. आत्महत्या करून तुमचंच कुटुंब उघड्यावर पडणार आहे. आपल्या आई-बापाकडे कोणी लक्ष देत नाही, आपल्या मुलांकडे कोणी लक्ष देत नाही. तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे आहात. आपण त्यांच्या रक्ताचे वंशज आहोत, आपण छत्रपतींचे वंशज असल्याने आपण लढायचे आहे. मरायचे नाही. आत्महत्येने एक माणूस कमी होतोय. आपली माणसं वाढली पाहिजेत, आपली शक्ती वाढली पाहिजे. आपण लढू पण आत्महत्या करायची नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे कधीच आत्महत्या करत नव्हते, असे म्हणत जरांगे पाटलांनी मराठा समाजातील तरुणांना आत्महत्या न करण्याचं आवाहन केले आहे.

# ऋषी महर्षी वाल्मीकी



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**सांस्कृतिक जीवनाच्या वाटचालीत, पडझळीत विविध आक्रमण काळातील अंधारलेल्या युगात सत्याचा, धर्माचा, जीवनमर्यादांचा दिव्य प्रकाश दाखवणारे दीपस्तंभ म्हणून पूर्णत्वास आलेले अक्षर वांग्मय म्हणजेच रामायण. मानवी जीवनाशी संबंधित असलेल्या सर्व भूमिकांचा परमच्च उत्तुंग आदर्श असलेल्या प्रभू श्री रामचंद्रांचे महन्मंगल चरित्र ज्यांच्या दिव्य प्रतिभेतून साकार झाले आहे त्या महर्षी श्री वाल्मिकींची अश्विन शु.पौर्णिमेला जयंती.भारतीय संस्कृतीचे शाश्वत आधारस्तंभ असलेले महाकाव्य रामायण रचियेता महान तपस्वी वाल्मिकींनी शतकोटी वाङ्मय रचले असून त्यांनीच राम नावाचे अभिवादन आणि सियाराम नावाची युगवाणी उदयास आणली. "कूजन्तं रामरामेति मधुरं मधुराक्षरम्। आरुह्य कविताशाखां वन्दे वाल्मीकिकोकिलम् ॥"**

अर्थात, कवितेच्या शाखेवर बसून वाल्मिकीरूपी कोकिळ राम राम अशा मधुर अक्षरांचे कुंजन करत आहे, त्या वाल्मिकीरूपी कोकिळाला मी वंदन करतो. रामायण ग्रंथातील तत्त्वज्ञानाने भारतीय संस्कृतीला नीती मूल्यांचे जीवनाच्या शाश्वत चिरंतन मूल्यांचे अधिष्ठान मिळाले आहे. महर्षी श्री वाल्मिकींच्या दिव्य प्रतिभेतून प्रकट झालेल्या या रामायण महाकाव्याचा त्यातील विविध व्यक्ती जीवन जीवनाचा प्रभाव विश्वव्यापी आहे. विश्वसंचार करणाऱ्या आपल्या पूर्वजांनी ही राम कथा आपल्या सोबतच्या जगाच्या विविध देशांमध्ये नेली, ते परत आले पण जीवन जगण्याचे तत्त्वज्ञान शिकवणारी रामकथा तिथे रुजली विकसित झाली, त्यांच्याही जीवनाची अविभाज्य अंग झाली. महर्षी वाल्मिकी आपली दीर्घ तपसाधना संपवून हिमालयाचा उतार उतरून मोठ्या आनंदी आणि प्रसन्न अंतःकरणाने गंगा- यमुनाच्या पवित्र अंतरवेलीकडे येत होते. दीर्घतप साधनेपुढे महर्षी वाल्मिकी स्वतःचे अस्तित्व देखील विसरून चालले होते. या अवघ्या चराचरातून व्यापून राहिलेल्या चैतन्य शक्तीचा त्यांना पुन्हा पुन्हा प्रत्यय येत होता. त्यांच्या प्रत्येक श्वासागणित ओंकाराचे स्मरण स्मरण होत होते. त्यांच्यातील मी पूर्णपणे समाप्त होऊन विचारधारेचा प्रत्येक ओघ दुसऱ्याला आनंद देण्याच्या उद्देशाने उद्युक्त झाला होता. श्वासाचा श्वासाच्या प्रत्येक स्पंदना सोबत आनंदाचे डोही आनंद तरंग ही अनुभूती येत असतांनाच अचानक या ओंकाराची लय तुटून महर्षी वाल्मीकींच्या कानांवर एक दीर्घ आक्रोश येऊन आदळला. वेदनेच्या चित्काराने आनंद सरोवरात एकदम खळबळ माजली. महर्षी समोर पाहतात तो वृक्षावर आनंद उत्सवात मग्न असलेल्या क्रौंच युगलावर एका पारध्याने आपले शरसंधान साधलेले होते. बाण जिव्हारी लागून क्रौंच पक्षी खाली पडून मृत्यूच्या वाटेवर पंख फडफडवत तळमळत होता. पक्षिणी अतिचित्कार करीत होती. विव्हळण्याचे ध्वनी महर्षींच्या अंतःकरणात परावर्तित झाले. सर्वांसाठी सर्वत्रिक संख्याची आनंदगाथा गाणाऱ्या महर्षी वाल्मिकींच्या मुखातून आपसूक शाप वाणी उच्चारली गेली.

**मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समः । यत् क्रौंचणिमिथुदेकं अवधीः काम मोहितम् ।।**

हे निषादा तू विनाकारण प्रेमात मग्न असणाऱ्या निरपराध पक्ष्यांचा जीव घेतलास. तुला कधीही सुख मिळणार नाही. महर्षींच्या उरात कोंडलेला संताप त्यांच्या ओठांवर उमटला तो या विश्वातलं पहिलं आदिकाव्य बनून ! रामायणाची सुरुवात झाली त्याआधी घडलेला हा प्रसंग, यामुळे वाल्मिकींना प्रेरणा मिळाली. जगाच्या पाठीवरील ही पहिली कविता हा पहिला श्लोक अनुष्ठुभछंद. ह्याच अनुष्टुभ छंदात संपूर्ण रामायण बद्ध आहे. शरविद्ध पाखराच्या चोचीत कमंडलूतुन जल शिंपण करावे या उद्देशाने पुढे धावलेले महर्षी पाहतात, तर तो पारधी पक्षाचे पाय बांधून त्याला उलटे टांगून घेऊन जात होता दिसणारे दृश्य महर्षींना सहावेना. महर्षींच्या अंतःकरणातील अनुष्ठुभ छंदाची लय वाढली. शब्द मात्र मुकेच राहिले अंतःकरणात उमलणारे अजूनही ओठावर येत नव्हते. महर्षी वाल्मिकींचे विचार चक्र वेगाने फिरत होते. पाय प्रयागाच्या दिशेने पुढे पुढे सरकत होते. सोबतीला त्या अनुष्ठूभ छंदाची लय होतीच. महर्षी पहाटेच्या वेळी उषा सुक्त गात, उदयकाली सूर्यस्तवन म्हणत, मध्यान्हीला अन्नमंत्र आणि सायंकाळी इंद्रदेवाचे स्तवन, निद्राकाळी आर्यमा देवतेची स्तुती गात. या साऱ्यांपाशी विनीत भाव होता. भव्यतेमुळे पुढे नम्र नतमस्तक होण्याचा उमाळा होता. या उपायांनी भागणारे नव्हते. यावेळी नुसती शापवाणी काम करणारी नव्हती, तर या तळमळणाऱ्या अनुष्ठुभ छंदाला एक पूर्ण पुरुषोत्तमाचे चरित्र गायन करण्याची ओढ लागली होती. आदर्श पुत्र, आदर्श बंधू, आदर्श राजा, एक पत्नी, एकवचनी, एकबाणी ह्या साऱ्या दैवी गुणांचा समुच्चय असलेला महामानव, ज्याचे चरित्र स्मरण सहस्त्रावादी वर्षांच्या कालौघातही स्थिर राहील. त्या सर्वोच्च जीवनाचा लहानसा अंशही जीवाला जीवनाला उधळून टाकील त्याच्या कोदंडाच्या टणत्काराने विचार दबून जाईल तो दृष्टांचे निर्धारण करील. यानंतर महर्षी वाल्मीकींनी ज्याप्रमाणे योगमायेनं तळहातावरचा आवळा निरखावा इतक्या तपशीलवार त्यांनी श्रीरामांचं चरित्र न्याहाळलं, मनात ठसवलं आदिकवी तेव्हढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांच्या काव्यप्रतिभेतून चोवीस हजार श्लोकांनी समृद्ध असं अनुष्ठुपछंदातील वाल्मिकी रामायण उभं राहिलं.

वाल्मिकिंचें रामायण हा दीपस्तंभ मानवाच्या उत्कर्षाकरिता मार्गदर्शक आहे. श्रीराम हे भारताचे सर्वच भारताचे श्रद्धास्थान असून वाल्मिकी रामायणातील लक्ष्मण, हनुमंत यांच्यासह सीता, शबरी, अहल्या, तारा, मंदोदरी या स्त्रिया देखील आमच्या सर्वांच्या आस्थेच्या नितांत श्रद्धेच्या आहेत. रामायणातील दशरथ, कौशल्य, कैकयी, सुमित्रा, लक्ष्मण, भरत शत्रुघ्न इत्यादी व्यक्तिरेखा मानवी जीवनातील विविध भावाचे उत्तुंग शिखर आहे. त्यांच्या भाव प्रकटनातून महर्षी वाल्मिकींनी संपूर्ण मानवी जीवनाचा उत्क्रांतीपटच रेखाटला आहे. वाल्मिकींच्या रामायणाने भारतीयच नव्हे तर अवघी मानवी संस्कृतीच समृद्ध केली आहे. राम हे मर्यादा पुरुषोत्तम होत. रामाच्या व्यक्तीचित्रणाच्या रूपाने महर्षी वाल्मिकींनी मानवासमोर जीवन विकासाचे मानचिन्ह उत्पन्न केले असून लक्ष्मणाच्या रूपाने या मानचिन्हाची महान साधनाच त्यांनी उत्पन्न केली आहे. लक्ष्मण हा रामाचा बहिःश्चर प्राण होता असे महर्षी वाल्मिकी म्हणतात. बहिःश्चर प्राण ही उत्कृष्ट उपमा महर्षी वाल्मिकींच्या प्रतिभेची उंची दाखविते. रामायणात महर्षींनी लक्ष्मणाचे व्यक्तिचित्र अशा अद्वितीयतेने मांडले आहे की, लक्ष्मणाचे व्यक्तिचित्र महर्षी वाल्मिकींच्या प्रतिमेतून निर्माण झाले नसते, तर कदाचित त्यांच्या प्रतिमेला द्रष्टेपणाच्या दृष्टीने एक प्रकारचा उणेपणाच आला असता. राजमहालातील ऐश्वर्य संपन्न जीवन सोडून वनवास पत्करण्याची तयारी असलेल्या भारतासाठी प्रभू रामचंद्रांच्या तोंडी महर्षी वाल्मिकींनी खालील वाक्य टाकलेले आहे - "न सर्वे भ्रातार स्तात भवंती भरतोपमा : ।" म्हणजे जगातील सर्वच बंधू काही भरता सारखे नसतात या एका वाक्यातच भारताचे संपूर्ण चरित्र महर्षींनी कथन केले आहे. राजर्षी भरताचे हे व्यक्तिमत्व संस्कृतिक, अध्यात्मिक वाङ्मयाचा अमर अलंकार आहे, जो महर्षी वाल्मिकींच्या प्रतिभेवाचून दुसरा कोणीच उत्पन्न करू शकत नाही. महर्षी वाल्मिकींनी आपल्या प्रतिभेने ज्या तऱ्हेने भारताचे चरित्र रामायणात उत्पन्न केले आहे ते म्हणजे खरोखर आपल्या समाजावर अनंत उपकार आहेत. मूळ संस्कृत वाल्मिकी रामायणाचे बालकाण्ड, अयोध्याकाण्ड, अरण्यकाण्ड, किष्किंधाकाण्ड, सुंदरकाण्ड, युद्धकाण्ड, उत्तरकाण्ड असे सात खंड आहेत. यातील हनुमंताने केलेल्या काण्डाला महर्षी वाल्मीकींनी सुंदरकाण्ड असे नाव दिले आहे. ह्या सुंदर काण्डाचे ऐकून ६८ सर्ग आहेत. आजकाल विविध माध्यमांतून आपल्या समोर मांडल्या जाणाऱ्या रामायणातील काही अतिरंजीत इतिहास मूळ वाल्मिकी रामायणात समाविष्ट नाही.

महर्षी वाल्मीकींनी लिहलेल्या या महाकाव्यास साडेपाच हजार वर्षे पूर्ण झाल्यानंतरही रामायणातील प्रत्येक व्यक्तीचा ठसा आज देखील आपणा सर्वांच्या मनावर कायम आहे. महर्षी वाल्मीकींचे रामायण आणि त्यातील राम हे भारतीयांच्या जीवनाचे एक अंगच बनलेले आहे. नुसती वर्षामागून वर्षे गेली असे नव्हे तर युगामागून युगे लोटली तरी या राम कथेची महती कायमच आहे. तसेच रामायणाची गोडी अजूनही अविट आहे. महर्षी वाल्मिकींच्या समर्थ दिव्य प्रतिभेचा स्पर्श झाल्याने राघव कथेचा हा महन्मंगल प्रवाह लोकांच्या मनामनातून व हृदयातून झुळूझुळू वाहतच आहे.

वाल्मिकींच्या या रामायणात तत्त्वज्ञानाची गंगा आहे. श्लोक व सुभाषितांच्या माध्यमातील काव्याची यमुना आहे. प्रकट व अप्रकट अशा नीतीच्या शिकवणीची सरस्वती आहे, आणि खरोखरी या त्रिवेणी संगमामुळेच या ग्रंथाराजाला तीर्थराज प्रयागाचे अलौकिक महत्त्व प्राप्त झालेले आहे.

आजच्या या यांत्रिक व अस्थिर जीवनात सर्वांचीच मने शुष्क झालेली आहेत. प्रेमाची आपुलकीची भावनाच नष्टप्राय होत असल्यामुळे जीवन उदास आणि निष्प्रेम होऊ लागले आहेत. सतत धावपळ, स्पर्धा, स्वार्थ हेच आजच्या युगाचे पर्वलीचे शब्द झाल्यामुळे स्वास्थ नाहीसे झालेले आहेत. पूर्वी एकमेकांबद्दल वाटत असलेली आपुलकी आत्मीयता कमी होऊ लागलेली आहे.माणसाचे जीवन सुखी करावयाचे असेल तर त्या दडपलेल्या चांगल्या भावना उत्तेजित व्हावयास हव्या. माणसाच्या मनाचा शोध घेण्याचे व त्याच्या सद्भावनेला आव्हान करण्याचे सामर्थ्य आपला प्राचीन धर्मग्रंथ वाल्मिकी रामायणात आहे. महर्षी वाल्मिकींच्या दिव्य प्रतिभेने निर्माण केलेले स्वर्गीय सृष्टीचा अविष्कार असलेले रामायण फक्त भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासात तोड नसलेले महाकाव्य आहे.

# चेस्टर कार्लसन आणि झेरोग्रॉफी!



श्रीकृष्णदास निरंकारी
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**एखाद्या प्रक्रियेचे नाव सर्वनाम होणे किंवा क्रियापद होणे, ही त्या प्रक्रियेच्या लोकमान्यतेचीच खूण असते. आज जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात, एखाद्या दस्तऐवजाची आहे तशी प्रत काढणे, याला त्याची झेरॉक्स काढणे असेच म्हटले जाते. इतक्या लोकोपयोगी आणि लोकप्रिय तंत्राचा शोध मात्र केवळ शोधकाच्या गरजेतून लागला. चेस्टर कार्लसन नावाच्या अमेरिकेतील स्वामित्व हक्कनोंदणी कार्यालयात काम करणाऱ्या गृहस्थांना, रोज अनेक कागदांच्या प्रती तयार करायला लागायच्या. कार्लसनला संधिवात असल्याने हे काम त्यांना अतिकष्टदायक होत होते. ते कष्ट कमी करण्यासाठी काही यांत्रिक उपाय शोधावेत म्हणून ते कामाला लागले.**

घरच्या स्वयंपाकघरात त्यांनी प्रयोग सुरू केले आणि दि.२२ ऑक्टोबर १९३८ रोजी प्रकाशाचा वापर करून प्रती तयार करण्याचे नवीन तंत्र विकसित करण्यात यश मिळविले. सन १९३९ ते १९४४पर्यंत त्यांनी आयबीएम, जीई यांसारख्या विस कंपन्यांचे उंबरठे झिजवले, पण कुणालाच या यंत्रात काही दम आहे, असे वाटले नाही. अखेर सन १९४७मध्ये हॅलोईड कॉर्पोरेशन या न्यूयॉर्कमधील एका छोट्या कंपनीने यात रस दाखवला आणि या यंत्रांचे व्यावसायिक तत्त्वावर उत्पादन करायची तयारी दाखवली. कार्लसन तोपर्यंत या तंत्रज्ञानाला इलेक्ट्रोफोटोकॉपीइन्ग याच नावाने संबोधत होते. हॅलोईडला हे नाव फार लांबलचक वाटल्याने त्यांनी याला झेरोग्राफी हे नाव दिले. ग्रीक भाषेत याचा अर्थ ड्राय रायटिंग- कोरडे लिखाण असा होतो. या तंत्रावर चालणाऱ्या यंत्रांना त्यांनी झेरॉक्स यंत्रे असे नाव दिले आणि पुढे आपल्या कंपनीचे नावही झेरॉक्स कॉर्पोरेशन असे बदलले. झेरॉक्स यंत्राची माहिती घेण्याआधी आपण जरा यामध्ये वापरले गेलेले शास्त्र आणि तंत्रज्ञान समजावून घेऊ. आपण सर्वांनीच लहानपणी कपड्यावर फुगा घासल्यावर तो कपड्याला चिकटला जाण्याची जादू अनुभवली आहे. याचे शास्त्रीय कारण स्थिर विद्युत असते, हेही शाळेत शिकल्याचे आठवत असेल. पण यात नक्की काय होते ते पाहू. फुगा कापडावर घासल्याने कापडाच्या पृष्ठभागावरील इलेक्ट्रॉन मोकळे होतात आणि फुग्याला चिकटतात. कापडावरील इलेक्ट्रॉन कमी झाल्याने तो घनभारित- पॉझिटिव्ह होतो तर फुग्यावरील इलेक्ट्रॉन वाढल्याने तो ऋणभारित- निगेटिव्ह होतो. दोन विरुद्ध भाराचे पृष्ठभाग एकमेकांसमोर आल्याने ते एकमेकांना चिकटतात. आता याचा झेरोग्राफीशी काय संबंध? तर विद्युत आणि चुंबकत्व या दोन ऊर्जांनी बनलेल्या प्रकाशामुळे कार्यान्वित होणारा प्रकाशवाहक- फोटोकण्डक्टर हा या तंत्रातील महत्त्वाचा घटक होय. जेव्हा कुठल्याही प्रकाशवाहकावर प्रकाश पडतो तेव्हा त्याचा प्रकाशित झालेला भाग विद्युतभारित होतो, हे तत्त्व या तंत्रज्ञानात वापरले गेले आहे. यंत्रात कार्यप्रणाली अशी चालते- १) प्रभारीकरण- चार्जिंगः प्रकाशवाहक पदार्थाचा थर असलेला दंडगोल उच्च दाबाच्या स्थिर विद्युतभाराने भारित करण्यात येतो. प्रकाश पडल्यावर विद्युतवाहक बनणाऱ्या सेलेनियम नावाच्या अर्धवाहकाचा याकरता उपयोग केला जातो. २) प्रकाशात आणणे- एक्स्पोजरः प्रखर प्रकाशाचा झोत, ज्याची प्रत काढायची आहे त्या मूळ कागदावरून, प्रकाशवाहक दंडगोलावर परावर्तित करण्यात येतो. कोऱ्या भागावरून येणारा प्रकाश त्या भागातील दंडगोलाला विद्युतवाहक बनवतो आणि त्यामुळे त्यातील विद्युतभार जमिनीत जाऊन- अर्थिंग नाहीसा होतो. मूळ कागदावरील मजकूर-चित्रे असलेल्या भागावरून प्रकाश परावर्तित न झाल्याने त्या भागाला सामोरा गेलेला दंडगोलाचा भाग ऋणभारितच राहतो. यालाच स्थिर विद्युत सुप्त- लॅटेंट प्रतिमा म्हणतात. ३) प्रकटीकरण- डेव्हलॅपिंगः प्रतिमा प्रकट करण्यासाठी टोनर- कोरडी रंगीत रासायनिक पूड (शाई नव्हे) वापरतात. ही पूड घनभारित असते. ज्याप्रमाणे फुग्याच्या खेळात फुगा कापडाला चिकटतो, तशीच जेव्हा ही पूड दंडगोलाच्या संपर्कात येते, तेव्हा दंडगोलाच्या ऋणभारित भागावर चिकटते. ४) हस्तांतरण- ट्रान्सफरः दंडगोलावरील ऋणभारापेक्षा जास्त ऋणभार दिलेला कागद जेव्हा दंडगोलाच्या संपर्कात येतो, तेव्हा दंडगोलावर चिकटलेली पूड कागदावर चिकटते आणि या कागदावर मूळ कागदाची हुबेहूब प्रतिमा तयार होते. ५) वितळणे- फ्युजिंगः प्रतिमा उमटलेला कागद दाब देणाऱ्या रोलरमधून पुढे पाठवताना गरम वातावरणाला सामोरा जातो त्यामुळे टोनरची पूड कागदावर वितळून घट्ट चिकटते. प्रत काढण्याची प्रक्रियाः अ) ज्याची प्रत काढावयाची आहे, तो कागद यंत्रातील काचेवर ठेवला जातो आणि त्यावर झाकण ठेवले जाते. आ) दिव्याचा प्रखर झोत कागदावरून परावर्तित केला जातो. कागदावरील प्रतिमेनुसार कमी-जास्त प्रकाश परावर्तित होतो. जिथे कागद कोरा आहे, तिथून जास्त तर जिथे काही लिहिलेले आहे तिथून कमी किंवा अजिबात नाही. इ) मूळ कागदाची विद्युत छाया सेलेनियम या प्रकाशवाहकाचा थर दिलेल्या सरकत्या पट्टीवर पडते. आधुनिक यंत्रात दंडगोलाऐवजी पट्टा वापरतात. ई) पट्टा सरकताना ही छायाप्रतिमा आपल्याबरोबर पुढे नेतो. उ) टोनरच्या डब्याजवळून जाताना त्यातील पूड पट्टीवर पसरली जाते. ऊ) विद्युतभारित पूड पट्टीवर मूळ कागदाची प्रतिमा बनवते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वंचित बहुजन आघाडी संपर्क कार्यालयाचे सुजात आंबेडकर यांच्या हस्ते उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** येथील वंचित बहुजन आघाडी संपर्क कार्यालयाचे सुजात आंबेडकर यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. आज महाराष्ट्रात शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य माणसाच्या समस्यावर थेट हात घालून काम करणारा वंचित बहुजन आघाडी हा एकमेव पक्ष असल्याचे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडी चे युवा नेतृत्व सुजात आंबेडकर यांनी कन्नड तालुका संपर्क कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी केले.

कन्नड शहरातील खांडसरी रोड, ग्रामीण पोलिस स्टेशन जवळ कन्नड तालुका वंचित बहुजन आघाडी संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले यावेळी पुढे बोलतानां ते म्हणाले की संपर्क कार्यालयातून सर्वसामान्याचे प्रश्न सोडविणे व लोकांना जोडण्यासाठी संपर्क कार्यालयचा उपयोग झाला पाहिजे. गायरान धारकाचा प्रश्नावर, विद्युत मंडळाचे वाढीव बिल प्रश्न, कंत्राटी भरती या व जनतेच्या इतर प्रश्नावर वंचित बहुजन आघाडी नेहमीच लढा देत आली आहे. प्रास्ताविक करताना वंचित बहुजन आघाडीचे कन्नड तालुका अध्यक्ष अनिल सिरसाठ यांनी कन्नड तालुका हा क्रांतिकारी तालुका असून मक्रणपुर येथे बाबासाहेबांच्या पदस्पर्शने पवित्र अशी मानली जाते. वंचित बहुजन आघाडी माध्यमातून पक्ष वाढीसाठी तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यक्रते प्रयत्न करतील. यावेळी महाराष्ट्र प्रदेश महासचिव तथा जिल्हा प्रभारी अरूधंतीताई सिरसाठ, महा. राज्य सदस्य अमित भुईंगळ, पश्चिम जिल्हा अध्यक्ष योगेश बन, पूर्व जिल्हा अध्यक्ष प्रभाकर बकले, महिला जिल्हा अध्यक्ष लता बमणे, युवा जिल्हा अध्यक्ष सतिश गायकवाड ॲड. पंकज बनसोड, रुपचंद गाडेकर, गणेश कोतकर, पी. के. दाभाडे व जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सुत्र सुंचालन विनोद कदम यांनी तर आभार गणेश मोरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी आयोजक तथा पु. तालुका अध्यक्ष अनिल सिरसाट, विनोद कदम, गणेश मोरे, सुभाष सिरसाठ, अक्षय महाले, अमोल साळवे, सतिश धनेधर, भिमराव खिल्लारे, कचरू मेंगाळ, मुकेश थोरात, अविनाश राठोड, विकास राठोड, प्रवीण धिवर, असिफ शेख, राहुल जाधव, विशाल पवार, मुकेश गायकवाड, संदीप अंभोरे व मोठ्या संख्या ने महिला पुरुष उपस्थित होते.



# फुलंब्री तालुक्यातील ४० गावांचा मतदानावर बहिष्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** फुलंब्री तालुक्यातील ४० गावांचा मतदानावर बहिष्कार टाकण्याचा ठराव तर २५ गावांमध्ये राजकीय नेत्यांना गावात प्रवेश नाही असे फलक लावण्यात आले आहेत. सिल्लोड तालुक्यातील २७ गावातील गावकऱ्यांनी राजकीय पुढाऱ्यांना गावात प्रवेश बंदीचा निर्णय जाहीर केला आहे. खुलताबाद तालुक्यातील २९ गावांत पुढाऱ्यांना गावबंदी अन् निवडणुकीवर बहिष्कार टाकला.



# सुजात आंबेडकर यांच्या हस्ते जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर व प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली, वंचित बहुजन आघाडीचे युवा नेतृत्व मा. सुजात दादा आंबेडकर यांच्या शुभ हस्ते जनसंपर्क, प्रचार, प्रसार कार्यालयचे खुलताबाद तालुक्यातील काटशेवरी फाटा येथे उद्घाटन सोहळा व मार्गदर्शन केले.

या प्रसंगी अरुंधतीताई शिरसाट,(व.ब.म.आ. प्रदेश महासचिव तथा औरंगाबाद जिल्हा प्रभारी) मा. अमित भाऊ भुईगळ (युवा आघाडी राज्य सदस्य) मा. प्रभाकर बकले (जिल्हाध्यक्ष औरंगाबाद पूर्व) मा. लताताई बामणे (जिल्हाध्यक्ष महिला आघाडी) मा. सतीश गायकवाड (जिल्हाध्यक्ष युवा आघाडी) मा.पंकज बनसोडे, मा. मिलिंद बोर्डे.मा. संघराज धम्मकीर्ती (जिल्हा महासचिव) मा. रूपचंद गाडेकर (जिल्हा उपाध्यक्ष)मा.अफसर पठाण प्रवीण जाधव व इतर जिल्हा पदाधिकारी,व सम्यक विद्यार्थी आंदोलन, फुले आंबेडकर विद्त्त सभा, सर्व सलग्न संघटना व संस्था, योगेश गुलाबराव बंद जिल्हाध्यक्ष, मुक्तार भाई सय्यद (खुलताबाद तालुकाध्यक्ष) राजाराम घुसाळे, अण्णा बनकर, कैलास बनकर, रवी जाधव, राज बनकर, अरुण गायकवाड, सुरेश गवळे, दीपक सातदिवे, नईम चाऊस, बाळू भालेराव, राजी गुंजाळ, गुड्डू भालेराव, रविराज बनकर, बाळू गायकवाड तालुका, शहर, सर्कल, गण, बुथ पदाधिकारी व कार्यकर्ते मोठे संख्येने उपस्थित होते.





| उपक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता | कालावधी | पात्रता | वय |
|---|---|---|---|---|
| GNM | ४० | ३ वर्ष | १२ वी पास (विज्ञान,कला,वाणिज्य) | १८ ते ३४ वर्ष |
| ANM | २० | २ वर्ष | १२ वी पास (विज्ञान,कला,वाणिज्य) | १८ ते ३४ वर्ष |

महाराष्ट्र Business Katta












# दादा, तुम्ही गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराशी लढाच!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र पोलीस गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराशी लढण्यासाठी आणि सर्व नागरिकांची सुरक्षा आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी कटिबद्ध आहे. महाराष्ट्र पोलीस देखील समाजाची सेवा करण्यासाठी आणि ज्या लोकांची सेवा करतात त्यांच्याशी नाते निर्माण करण्यासाठी कटिबद्ध आहे. गुन्हेगारी रोखण्यासाठी आणि सार्वजनिक सुरक्षा राखण्यासाठी पोलीस आणि समाज यांच्यातील द्दढ नाते आवश्यक आहे, असे महाराष्ट्र पोलिसांचे मत आहे. मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र पोलीस काय फरक?**

**(मागील अंकावरून)**
ड) स्पेशल युनिट्स- महाराष्ट्र पोलिसांमध्ये क्विक रिस्पॉन्स टीम- क्यूआरटी, बॉम्ब शोध, निकामी पथक- बीडीडीएस आणि डॉग स्क्वाड यासह विविध विशेष युनिट्स आहेत. ई) महिला पोलीस- विभागामध्ये महिला पोलीस अधिकारी देखील आहेत ज्या महिला आणि मुलांचा समावेश असलेल्या तपास, गस्त आणि प्रकरणे हाताळण्यासह विविध भूमिका बजावतात.
फ) आरोहित पोलिस- महाराष्ट्र पोलिसांकडे एक आरोहित पोलिस युनिट देखील आहे, जे विशिष्ट भागात गर्दी नियंत्रण आणि गस्त घालण्यासाठी घोड्यांचा वापर करतात.

आयुक्तालय ही एक प्रकारची पोलिस संस्था आहे, ज्याचे अध्यक्ष पोलिस आयुक्त असतात. आयुक्तालय क्षेत्रातील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी पोलिस आयुक्तांवर असते. राज्यातील इतर कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांशी समन्वय साधण्याचे अधिकारही पोलिस आयुक्तांना आहेत. राज्यातील प्रमुख शहरे आणि शहरांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी महाराष्ट्रातील आयुक्तालयांवर असते. गुन्ह्यांचा तपास आणि गुन्हेगारांना पकडण्यातही आयुक्तालयाची भूमिका असते. महाराष्ट्रातील आयुक्तालये राज्याच्या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेचा एक महत्त्वाचा भाग आहेत. ते उच्च स्तरीय पोलिसिंग प्रदान करतात, जे समुदायाच्या गरजा पूर्ण करतात. गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि सार्वजनिक सुरक्षा राखण्यासाठी आयुक्तालयांची भूमिका आहे. महाराष्ट्रात १० आयुक्तालये आहेत, ती अशी- मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, ठाणे, नवी मुंबई, कोल्हापूर, अमरावती आणि सोलापूर.

महाराष्ट्रात ११६ पोलीस मतदारसंघ आहेत. प्रत्येक पोलीस मतदारसंघाचा प्रमुख पोलीस निरीक्षक असतो. पोलीस निरीक्षक आपापल्या मतदारसंघातील कायदा व सुव्यवस्थेसाठी जबाबदार असतात. पोलिस निरीक्षकही गुन्ह्यांचा तपास करतात आणि गुन्हेगारांना पकडतात. महाराष्ट्रातील पोलीस मतदारसंघ तीन प्रकारात विभागले गेले आहेत- १) शहरी पोलिस मतदारसंघ- हे मतदारसंघ शहरे आणि शहरांसारख्या शहरी भागात आहेत. २) ग्रामीण पोलीस मतदारसंघ- हे मतदारसंघ ग्रामीण भागात आहेत. ३) विशेष पोलीस मतदारसंघ- हे मतदारसंघ पर्यटन क्षेत्र आणि औद्योगिक क्षेत्र यासारख्या विशेष सुरक्षा गरजा असलेल्या भागात आहेत. लोकसंख्येची घनता आणि परिसरातील गुन्हेगारी दरानुसार प्रत्येक श्रेणीतील पोलिस मतदारसंघांची संख्या बदलते. उदाहरणार्थ, ग्रामीण पोलिस मतदारसंघापेक्षा शहरी पोलिस मतदारसंघात अधिक पोलिस अधिकारी असतात. महाराष्ट्रातील पोलीस मतदारसंघ हे राज्याच्या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेचा एक महत्त्वाचा भाग आहेत. ते स्थानिक पातळीवरील पोलिसिंग प्रदान करतात जे समुदायाच्या गरजा पूर्ण करतात. गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि सार्वजनिक सुरक्षितता राखण्यात पोलीस घटकांचीही भूमिका आहे. महाराष्ट्र राज्याचे सद्याचे पोलीस प्रमुख मा.रजनीश सेठ हे आहेत. ते सन १९८८च्या बॅचचे भारतीय पोलीस सेवेतील महाराष्ट्र केडरचे अधिकारी आहेत. त्यांनी महाराष्ट्र पोलिसांमध्ये मुंबईचे पोलिस आयुक्त आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस महासंचालक यासह अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. ते अत्यंत अनुभवी आणि पात्र पोलीस अधिकारी आहेत. ते त्यांच्या मजबूत नेतृत्व कौशल्यासाठी आणि गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराशी लढण्यासाठी त्यांच्या वचनबद्धतेसाठी ओळखले जातात. सामुदायिक पोलिसिंगवर लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि ते सेवा देत असलेल्या लोकांशी संबंध निर्माण करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेसाठी देखील ओळखले जातात. ते महाराष्ट्र पोलिसांसाठी आणि महाराष्ट्रातील लोकांसाठी एक मौल्यवान संपत्ती आहेत. महाराष्ट्र प्रत्येकासाठी सुरक्षित बनवण्यासाठी ते कटिबद्ध आहेत. महाराष्ट्र पोलिसांचे ब्रीदवाक्य हे आहे- "सद्रक्षणाय खलनिग्रहणाय|" हे ब्रीदवाक्य महाराष्ट्र पोलिसांच्या कायद्याचे पालन आणि महाराष्ट्रातील लोकांचे रक्षण करण्याची वचनबद्धता दर्शवते. महाराष्ट्र पोलीस गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराशी लढण्यासाठी आणि सर्व नागरिकांची सुरक्षा आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी कटिबद्ध आहे. महाराष्ट्र पोलीस देखील समाजाची सेवा करण्यासाठी आणि ज्या लोकांची सेवा करतात त्यांच्याशी नाते निर्माण करण्यासाठी कटिबद्ध आहे. गुन्हेगारी रोखण्यासाठी आणि सार्वजनिक सुरक्षा राखण्यासाठी पोलीस आणि समाज यांच्यातील दृढ नाते आवश्यक आहे, असे महाराष्ट्र पोलिसांचे मत आहे. महाराष्ट्र पोलिसांचे ब्रीदवाक्य हे महाराष्ट्रातील लोकांची सेवा आणि त्यांना हानीपासून संरक्षण करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेची आठवण करून देणारे आहे.

पोलीस सार्वजनिक सुव्यवस्था आणि सुरक्षितता राखण्यासाठी, कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी, गुन्ह्यांचा प्रतिबंध आणि तपास करण्यासाठी आणि विशिष्ट अधिकारक्षेत्रात कायद्याचे राज्य राखण्यासाठी जबाबदार असलेली सरकारी किंवा कायद्याची अंमलबजावणी करणारी संस्था आहे. पोलिस अधिकारी, ज्यांना कायद्याची अंमलबजावणी अधिकारी म्हणूनही ओळखले जाते, कायद्यांचे पालन केले जाते आणि सार्वजनिक सुरक्षा राखली जाते याची खात्री करून व्यक्ती आणि समुदायांच्या हक्कांचे आणि कल्याणाचे रक्षण करण्यासाठी कार्य करतात. पोलिसांची काही प्रमुख कार्ये आणि भूमिका- कायद्याची अंमलबजावणीः पोलीस अधिकारी स्थानिक, राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावर कायद्यांची अंमलबजावणी करतात. ते त्यांच्या नियुक्त केलेल्या भागात गस्त घालतात, आणीबाणीच्या कॉलला प्रतिसाद देतात आणि गुन्ह्यांचा तपास करतात. यामध्ये गुन्हे केल्याचा संशय असलेल्या व्यक्तींना पकडणे आणि त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू करणे समाविष्ट आहे. गुन्हेगारीस प्रतिबंधः गुन्हे घडू नयेत यासाठी पोलीस सक्रिय प्रयत्न करतात. यामध्ये कम्युनिटी पोलिसिंग, पाळत ठेवणे, गुन्ह्यांचे विश्लेषण आणि गुन्हेगारी वर्तनाची मूळ कारणे दूर करण्याच्या उद्देशाने आउटरीच कार्यक्रम यांचा समावेश असू शकतो. सार्वजनिक सुरक्षाः पोलिस अधिकारी अनेकदा आपत्कालीन परिस्थिती, अपघात आणि सार्वजनिक सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या घटनांना प्रथम प्रतिसाद देतात. ते सहाय्य प्रदान करतात, प्रथमोपचार व्यवस्थापित करतात आणि आवश्यकतेनुसार इतर आपत्कालीन सेवांशी समन्वय साधतात. वाहतूक नियंत्रणः वाहतूक पोलिस अधिकारी वाहतूक प्रवाहाचे व्यवस्थापन आणि नियमन करतात, वाहतूक नियमांची अंमलबजावणी करतात आणि अपघातांची चौकशी करतात. रस्ता सुरक्षा सुनिश्चित करणे आणि वाहतुकीचे उल्लंघन रोखणे ही त्यांची भूमिका आहे. महत्त्वाचा तपासः पोलिस गुन्ह्यांचा तपास करतात, पुरावे गोळा करतात, साक्षीदार आणि संशयितांची मुलाखत घेतात आणि खटला चालवण्यासाठी केस तयार करतात. पोलिस विभागातील विशेष युनिट्स विशिष्ट प्रकारचे महत्त्वपूर्ण तपास हाताळू शकतात, जसे की हत्या, अंमली पदार्थ किंवा सायबर गुन्हे. समुदाय पोलिसिंगः समुदाय पोलिसिंगमध्ये पोलिस आणि ते सेवा देत असलेल्या समुदायांमध्ये सकारात्मक संबंध निर्माण करणे समाविष्ट आहे. अधिकारी स्थानिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी, गुन्ह्याची भीती कमी करण्यासाठी आणि समस्या सोडवण्यासाठी सहकार्य करण्यासाठी समुदाय सदस्यांसह जवळून काम करतात. आपत्कालीन प्रतिसादः नैसर्गिक आपत्ती, दहशतवादी धोके आणि सार्वजनिक अशांतता यांसह विविध आपत्कालीन परिस्थितींना प्रतिसाद देण्यासाठी पोलिस जबाबदार आहेत. समन्वित प्रतिसाद सुनिश्चित करण्यासाठी ते अग्निशमन विभाग आणि पॅरामेडिक्स सारख्या इतर आपत्कालीन सेवांसोबत काम करतात. अधिकारांचे संरक्षणः पोलीस अधिकाऱ्यांवर व्यक्तींचे नागरी हक्क आणि स्वातंत्र्य यांचे रक्षण करण्याचे काम केले जाते. त्यांनी त्यांची कर्तव्ये पार पाडताना कायदेशीर आणि नैतिक मानकांचे पालन केले पाहिजे आणि व्यक्तींना निष्पक्ष आणि आदराने वागवले जाईल याची खात्री केली पाहिजे. गुन्ह्यांचे विश्लेषणः गुन्हेगारी क्रियाकलापांमधील नमुने आणि ट्रेंड ओळखण्यासाठी पोलिस विभाग गुन्हे विश्लेषण वापरतात. ही माहिती त्यांना संसाधने प्रभावीपणे वाटप करण्यात आणि गुन्हेगारी रोखण्यासाठी आणि त्यांचा सामना करण्यासाठी धोरणे विकसित करण्यात मदत करते. जनसंपर्कः पोलीस पोहोच कार्यक्रम, सार्वजनिक शिक्षण आणि सामुदायिक कार्यक्रमांद्वारे समुदायाशी संलग्न असतात. विश्वास निर्माण करणे, सकारात्मक संबंध वाढवणे आणि कायद्याची अंमलबजावणी आणि जनता यांच्यातील सहकार्याला प्रोत्साहन देणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की पोलिस विभागांची रचना, आकार आणि विशेषीकरण यात भिन्नता असू शकतात. ते अधिकारक्षेत्र आणि ते सेवा देत असलेल्या समुदायाच्या विशिष्ट गरजांवर अवलंबून असतात. सार्वजनिक सुरक्षा राखणे, कायद्याचे पालन करणे आणि समाजात अधिकार आणि न्यायाचे दृश्य प्रतीक म्हणून काम करणे हे पोलिसांचे प्राथमिक ध्येय आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्ध चळवळ



भीमराव सरवदे
संपर्क क्र : 9405466441

आधुनिक केसरी

**अस्पृश्यता ही भारताची, संपूर्ण समाजव्यवस्थेची आणि अगदी सुरुवातीच्या काळातली खूप मोठी समस्या होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म याच अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीत झाला. त्या अनुषंगाने भारतीय समाजव्यवस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या समाजाला सर्वच प्रकारच्या विशेषाधिकारांपासून कायम वंचित आणि उपेक्षित ठेवण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या समाजाची ही शोकांतिका होती. संसदीयप्रणाली, संविधानातील तरतुदी यांसारख्या समाजव्यवस्थेत परिवर्तन घडविण्याची क्षमता असणाऱ्या मुक्तीच्या शोधात बाबासाहेब होते.**

**(मागील अंकावरून)** याप्रसंगी बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांना बावीस प्रतिज्ञाही दिल्या ज्यामुळे बौद्ध धर्मांतरितांचे पुढील जीवनमान अंतर्बाह्य बदलणार होते. दलित वर्गाचे मोठ्या प्रमाणात बौद्ध धम्मात धर्मांतर ही भारतातील सामाजिक क्रांतीची ऐतिहासिक घटना म्हणावी लागेल. या प्रसंगी आपल्या अनुयायांना उद्देशून ते म्हणाले होते की, बौद्ध धर्माच्या दृष्टीने भारताची भूमी सद्या शून्यवत आहे, म्हणून आपण उत्तमरीत्या धर्म पाळण्याचा निर्धार केला पाहिजे. नाही तर महार लोकांनी तो निंदाजनक स्थितीस आणला असे होऊ नये, म्हणून आपण दृढ निश्चय केला पाहिजे. हे आपल्याला साधले तर आपण आपल्या बरोबर देशाचा, इतकेच नव्हे तर जगाचाही उद्धार करू. धर्मांतरित बौद्ध चळवळ भारतातील सध्याच्या समाजात सर्वाधिक प्रभावी आहे आणि जगातील समकालीन समाजात लोकप्रिय आहे. बौद्धधम्म प्रसारासाठी, बुद्धविहारे बांधण्यासाठी पाश्चिमात्य बुद्धिस्ट संघटनांकडून आणि जपानमधील बौद्ध संस्थांकडून अनेकदा सहकार्य मिळते. बोधगया येथील महाबोधी महाविहार हिंदूंच्या नियंत्रणातून मुक्त करण्यासाठी बौद्धांनी कडवी झुंजसुद्धा दिली आहे. बाबासाहेबांनी भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाच्या प्रस्तावनेत बौद्ध भिक्खुंबद्दल खूप महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. ते म्हणतात, भिक्खू निर्माण करण्यात भगवान बुद्धांचा काय हेतू होता? एक पूर्ण पुरुष निर्माण करणे हा हेतू होता काय? की जनतेच्या सेवेला आपले आयुष्य वाहिलेला आणि त्यांचा मित्र, मार्गदर्शक आणि तत्त्वज्ञ असलेला एक समाजसेवक निर्माण करणे हा हेतू होता? हा एक अगदी मत्त्वाचा प्रश्न आहे. त्यावर बौद्ध धर्माचे भवितव्य अवलंबून आहे. जर भिक्खू हा केवळ पूर्ण पुरुष असेल तर बौद्धधर्माच्या प्रसाराला तो उपयोगी होत नाही. कारण जरी तो पूर्ण पुरुष असला तरी तो स्वार्थी पुरुष आहे. उलटपक्षी तो जर समाजसेवक असला तर बौद्धधर्मास तो आशाजनक होऊ शकेल. आजच्या समग्र भिक्खु संघाने बाबासाहेबांच्या या चिंतनाचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. आंबेडकरी बौद्ध चळवळीमुळे भारतातील समाजात, विशेषतः खालच्या स्तरातील लोकांमध्ये काही प्रमाणात विकास झाला आहे. बाबासाहेब म्हणाले होते, माझे तत्त्वज्ञान बौद्ध शिकवणुकीवर आधारित आहे. स्वातंत्र्य आणि समता हे माझ्या तत्त्वज्ञानाचे मुख्य भाग आहेत. मानवाच्या मुलभूत हक्कांनुसार शिक्षण हे त्यापैकीच एक आहे. त्यामुळे प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार आहे. समाजव्यवस्था मोडीत काढण्यासाठी आणि आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे, हे बाबासाहेबांना ठाऊक होते. आज
आपण पाहत आहोत नवबौद्धांची शिक्षणात चांगलीच प्रगती झाली असून त्यांची साक्षरता भारतातील ब्राह्मण आणि इतर सर्व जातींइतकी झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्राचे अभ्यासक होते. त्यांनी अर्थशास्त्रावर तीन अभ्यासपूर्ण पुस्तके लिहिलीः (१) ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित्त, (२) ब्रिटिश भारतातील प्रांतीय अर्थव्यवस्थेची उत्क्रांती आणि (३) रुपयाची समस्याः त्याची उत्पत्ती आणि त्याचे निराकरण. बाबासाहेबांनी तीन प्रमुख गोष्टींवर लक्ष केंद्रित केले होते. १) जमीन सुधारणा, २) चलन समस्या आणि ३) अर्थविषयक समस्या. दलितांची आर्थिक प्रगती हा बाबासाहेबांचा ध्यास होता कारण आर्थिक समृद्धीशिवाय माणूस समाजात टिकून राहू शकत नाही, अशी त्यांची धारणा होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बौद्धधम्माच्या सामाजिक संदर्भात सुधारणावादी होते. ज्ञान आणि शिक्षण हा देशाचा कणा आहे, ही त्यांची तळमळ होती. स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आणि स्त्रियांना समान दर्जा आणि स्वातंत्र्य दिले. शाश्वत आणि पुरेशा जीवनशैलीत जगण्याचे स्वातंत्र्य, सर्व स्त्री-पुरुषांना चांगले शिक्षण मिळणे, आर्थिक विकास, औषधोपचार, जमिनीचे हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, राजकीय हक्कांचे स्वातंत्र्य इत्यादींचा पुरस्कार त्यांनी केला. त्यांच्या कर्तृत्वाने जीवनाच्या विविध क्षेत्रांवर प्रभाव टाकला असून सामाजिक-आर्थिक धोरणे, शिक्षण आणि सकारात्मक कृतीकडे पाहण्याचा भारताचा दृष्टीकोन बदलला आहे. त्यामुळे सर्व मानवांना जात, धर्म आणि
प्रतिष्ठा या निकषावर नव्हे, तर माणुसकीच्या आधारावर वागविणे तसेच बौद्धधम्माचा प्रसार व पुनरुज्जीवन करण्याचे त्यांचे स्वप्न साकार करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

**(लेखक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी असून आंबेडकरी व पेरियार चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

# विजयादशमी म्हणजे दुष्ट प्रवृत्तीचा नाश करून मिळालेला विजय

आधुनिक केसरी

लंकापती रावण हे महान राजनितिज्ञ व पराक्रमी राजा होते म्हणूनच त्यांना लंकापती रावण संबोधले जायचे.परंतु त्यांच्यात काही दृष्ट व वाईट प्रवृत्ती होत्या.त्यांनी माता सितेचे हरण करून राक्षसीप्रवृतीचा आगास केला. हा त्यांचा सर्वात मोठा गुन्हा होता आणि येथुनच लंकापती रावण परास्त होण्याला सुरूवात झाली.यानंतर रावणाने पुर्णपणे अधर्माचा मार्ग पत्करला अधर्माचा मार्ग सोडण्यासाठी देवी-देवता, आप्त-नातेवाईक, राजनैतिज्ञ गुरूसह अनेकांनी प्रयत्न केले. परंतु रावणाच्या अहंकारापुढे संपूर्ण प्रयत्न निष्फळ ठरले व सितेला हस्तगत करण्याच्या जीद्दीने रावणाने आपल्याच संपूर्ण कुळाला युध्दाच्या खाईत लोटले व लंकापती रावण यांच्या सर्वनाशाची आकाशवाणी झाली.हळूहळू संपूर्ण मोठ-मोठे बलाढ्य शुरविर धाराशाही झाले.यात मुख्यत्वेकरून मेघनाथ, कुंभकर्णासारखे महाबलशाली यांनाही रावणाने मृत्यूच्या खाईत लोटले. त्याच प्रवृत्तीचा नाश करण्यासाठीच प्रभुश्रीरामचंद्र हे धरतीवर अवतरले व रावणाच्या वाईट प्रवृत्तीचा रामानी वध केला. विजयादशमी म्हणजे असत्याचारावर सत्याचा विजय, अशुध्दतेवर शुध्दतेचा विजय, अंधारावर प्रकाशाचा विजय, अमानुषतेवर मानवतेचा विजय, निसर्गाचा होत असलेला ह्वास टिकवुन ठेवण्यासाठी वृक्षलागवड करणे हाही विजयच, म्हणजेच आत्म्यातील रावणाचे दहण करुन रामाने सांगितलेला सत्याचा मार्ग अवलंबने हाच खरा सण विजयादशमी होय. राम हे आदर्शपुरुष त्यामुळेच भारताने नेहमी आदर्शाचीच भुमिका जोपासली आहे. तेव्हाच भारतात सर्व धर्म समभाव दिसून येतो. त्याचप्रमाणे भारतीय संस्कृतित सर्वात महत्वाचा आणि शुभ दिवस म्हणजे "विजयादशमी" साडेतिन मुहुर्तापैकी एक असे या दिवसाला आगळेवेगळे महत्व आहे. घटस्थापनेपासुन तर दस-यापर्यंत संपूर्ण भारतात उत्सहाचे,आनंदाचे व मांगल्याचे वातावरण आपल्याला पहायला मिळते व याच दिवसापासुन दिवाळीचा शंखनाद संपूर्ण भारतात गुंजतो. नवरात्र उत्सवामध्ये देवीची 9 दिवस आराधना करून नवरात्र उत्सव साजरा केला जातो व दशमीला म्हणजेच विजयादशमीला दसरा उत्सव मोठ्या थाटात भारतभर साजता केला जातो. हा दीवस म्हणजे असुरीशक्तीचा नाश व सत्याचा विजय मानले जाते. दशमीला प्रभुरामचंद्राने रावणाच्या वाईट प्रवृत्तीचा संहार करुण असुरीशक्तीला संपवुन मानवतेचे रक्षण केले. त्या निमित्यानेच विजयादशमी उत्सव साजरा केला जातो. याच दीवशी मॉ जगदंबेने अनेक राक्षसाचा वध करुण विजय प्राप्त केला. त्याच प्रमाणे पांडव अज्ञातवासात असतांना पांडवांनी "शम्मीच्या" झाडावर लपविलेली शस्त्रे याच दीवशी काढण्यात आली व याच दीवशी रामाने रावणाच्या वाईट प्रवृत्तीचा वध करुन विजय प्राप्त केल्याच्या अनेक कथांमध्ये व पुराणांमध्ये आपल्याला पहायला मिळते. त्याच अनुशंगाने विजयादशमीला सोण्याच्या( आपट्याच्या )पाणाला तीतकेच अतुट महत्व आहे. सोण्याचे पाण एकमेकांना देवुन आनंदोत्सव साजरा करतात व लहान-मोठ्यांना शुभेच्छा व आर्शिवाद देतात.

# डॉ. मोमीन : नर्सिंग क्षेत्रातील थोर लेखिका, उत्तम प्रशासक



डॉ. दीपाली उमाळे
मुंबई. मो. ९९६९७३९८३३

आधुनिक केसरी

**जर एखाद्याची जबरदस्त इच्छाशक्ती आणि दृढनिश्चय असेल तर कसलेही ध्येय गाठण्याची कोणतीही बाब त्याच्या आड येऊ शकत नाही, मग तेव्हा धर्म लिंग, काहीही असू द्या असेच झाले एम. आय. मोमीन यांच्या बाबतीत. चला उलगडून बघूया डॉ. मोमीन यांच्या जीवनपटातील एक एक पान... अत्यंत विरोधी परिस्थितीत 1964 साली त्यांनी छत्रपती प्रमिला राजे रुग्णालयात जनरल नर्सिंग आणि मिडवायफरी साडेतीन वर्षाच्या कोर्सला ॲडमिशन घेतले. आपल्यासमोर उभा राहतो त्यावेळेसचा काळ मुस्लिम ते पण एकत्र कुटुंबात वाढलेली त्यात स्त्री फक्त घरच्यांचा विरोध नाही तर तेवढा समाजाचाही विरोध असणारच.**

त्या काळात मुलींना स्वतःचे निर्णय घेऊन आज सारखं आवडतं क्षेत्रात करिअर करण्याची मुभा तर नक्कीच नव्हती. डॉ. मोमीन सांगतात फक्त गुरूंचे आशीर्वाद म्हणून त्या हा खडतर प्रवास पार पाडू शकल्या. 1964 सालचे नर्सिंग तेही शासकीय संस्थेतून अर्थात त्या काळात खाजगी संस्था नव्हत्या. त्या काळाच्या सिलॅबस मध्ये थेरी कमी सर्व जोर प्रॅक्टिकल कामावरच दिला जायचा. त्या काळात ट्रेन नर्सेस फारच कमी होत्यां त्यामुळे सर्व जबाबदारी ही स्टुडंट नर्सेस वर पडत असे. दिवसा ड्युटी असल्यास निदान पर्यवेक्षणाला एक दोन स्टाफ सिस्टर असायच्या पण रात्र पाळीला एक सीनियर स्टुडन्ट व एक जुनियर असे आणि वॉर्डनचे पेशंट ऐशी ते शंभर, नाईट ड्युटी पाच दिवसाची एखाद्या फ्लोरलाच एक स्टाफ डॉक्टर अगदी सीएमओ एखादेच असायचे.

ॲडमिशन, सिरियस रुग्ण, इमर्जन्सी, अगदी रात्रभर सर्कसच चालायची पायांची अगदी तुटून जायचे. पण सांगता कुणाला! आलिया भोगासी असावे सादर. डॉक्टर मोमीन म्हणतात पण याचा फायदा मात्र आम्हालाच झाला रुग्णाशी नातेवाईकांशी कसे बोलावे?, त्यांच्या व्यथा समजून घेणे तसेच इमर्जन्सी हाताळणे. डॉक्टर परिचारिकांमधील बंधुभाव यामुळे त्यांच्याकडून भरपूर ज्ञान मिळायचे या सर्व बाबींमुळे डॉ. मोमीन यांची निर्णयशक्ती जबरदस्त बनली होती.

वास्तविक एम. आय. मोमीन यांना डॉक्टर बनण्याची तीव्र इच्छा होती पण मुलींचे स्वतंत्र कॉलेज नव्हते आणि घरच्यांना तर पुढील शिक्षण नकोच होते यांचे ध्येय होते फक्त मुलीचे लग्न करून देणे आणि जबाबदारीतून मोकळे होणे. शेवटी त्यांनी आपले हे ध्येय ट्रेनिंगच्या दुसऱ्या वर्षातच पूर्ण करून घेतलं आणी संसाराचा गाडा सुरू झाला, पुढची ओढा ओढ काही विचारू नका! त्याकाळी डॉ. मोमीन सांगतात सरकारी नोकरीची वाट पहावी लागत नव्हती ट्रेनिंग संपलं नोकरी आली. मोमिनाबाद आत्ताचे आंबेजोगाई येथे. पहिल्या प्रसूतीनंतर बदली झाली...ग्रामीण भागात आठ वर्षे खेड्यापाड्यात अगदी बिन पाण्याच्या दुष्काळी भागात आरोग्य केंद्रात रात्रीच्या वेळी डॉक्टर सुद्धा नाहीत त्या गावाची जबाबदारी परिचारिकेवर असायची मग ती प्रसुतीची केस असो साप विंचू चावलेला रुग्ण असो काहीही मग ती आरोग्य केंद्राची कुलपे उघडण्याची जबाबदारी परीचारिकेची. त्या काळात दळणवळणाची साधने ही एवढी नसल्याने त्या गावातून जवळपासच्या शहरात जायला एखादी गाडी सुद्धा नसायची. एकच गाडी एसटी बस सकाळी जाणार संध्याकाळी मुक्कामाला येणार संरक्षण कुणाचे एक नवऱ्याचे कारण पब्लिक म्हनणार, " काय पण होऊ दे तुम्ही उपचार करा सकाळी डॉक्टर आल्यावर पाहू!"

त्याचा परिणाम असा झाला की डॉक्टर मोमीन यांच्या भाषेत संसार सांभाळता सांभाळता रुग्ण नातेवाईक समुदाय सगळं काही सांभाळायचं त्यामुळे धाडस आले, इंडिपेंडेंट डिलिव्हरी केसेस हाताळल्या, प्रसूती कंडक्ट करू लागले इतकेच नव्हे तर अँटी स्नेक वेनम देऊन रुग्णाचे जीव देखील वाचवले. सर्व लेखि ऑर्डर्स सकाळी डॉक्टर आल्यावर लिहून द्यायचे मग डॉक्टर पुढचा व्यवहार सांभाळायचे ही सर्व सर्कस करता करता दुरस्त शिक्षणाद्वारे बीएएमएस शिक्षण पूर्ण केले डॉक्टरची डिग्रीज बाकी होती काम तर करतच होते.

त्यांनी पुढील शिक्षणाची इच्छा ओळखून PBBSC नर्सिंग कोर्सला मुंबईला गेल्या. त्याचबरोबर मॅडम ना पती व सासरच्या मंडळींचा





जबरदस्त पाठिंबा मिळाला, त्यांनी दोन लहान मुले सांभाळण्याची जबाबदारी घेतली. व मॅडम पुढील शिक्षणासाठी मार्गस्थ झाल्या. सर जे जे रुग्णालय, आय एन इ मधून १९७३ ते ७५ PBBSC नर्सिंग पुर्ण केले पण त्यानंतर सुद्धा एक वर्ष आणीबाणी मध्ये खेड्यात काम करावे लागले त्याचा एक फायदा असा झाला की कुटुंब नियोजन शस्त्र प्रक्रियेतील स्त्री नसबंदी, पुरुष नसबंदी करण्याचे कौशल्य पदरात पडले. 1976 साली पाठ्यनिर्देशका म्हणून मातृसंस्थेत काम करण्याची संधी आली. डॉक्टर मोमीन म्हणतात 18 वर्षे भ्रमंती थांबली नेतृत्व कला अंगात होतीच मग महाराष्ट्र गव्हर्मेंट फेडरेशनने अध्यक्षपदी दहा वर्षे भूषविले.

परिचारिकांचे फार हाल असतात तिन्ही शिफ्ट मध्ये ड्युटी करावी लागते, घरात स्वतःचे मुल आजारी असले तरी ते सोडून दुसऱ्यांच्या मुलाची सेवा करावी लागते पण सर्व परिचारिका हे काम अगदी मनापासून करत असतात हे देखील आवर्जून सांगतात डॉ. मोमीन. की कोरोना काळ हा तर आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांची परीक्षा घेण्यासाठी आला होता! सर्व परिचारिका कोरोना काळात आपली घरदारे सोडून कोरोना रुग्णांची सेवा करत होत्या. डॉक्टर मोमीन सांगतात की जनमानसामध्ये असा समज आहे की नर्सेस ची नजर थिजलेली आहे त्यांना मृत्यू पाहून सवय झाली आहे परंतु प्रत्यक्षात मात्र तसे नसते. सर्व परिचारिका आपल्या कर्तव्याला श्रेष्ठ मानतात. परिचारिका विद्यार्थ्यांना शिकवता शिकविता उच्च शिक्षणाची सूप्त इच्छा पुन्हा पुन्हा डोकं वर काढायची माझे वरिष्ठ अधिकारी व त्यांनी माझ्या प्रभावी ईच्छेला साथ दिली व MSC नर्सिंग त्यावेळेसचे एकुलते कॉलेज एल टी कॉलेज ऑफ नर्सिंग चर्चगेटला प्रतिनियुक्ती दिली. दुग्ध शर्करा योग म्हणजे डॉ. मोमीन यांच्या पतींनी ही पाठिंबा दिला आणि पुन्हा एकदा सुरुवात झाली नवीन प्रवासाची. L. T. कॉलेज बद्दल बोलायचे तर विद्या आणि मायेचे माहेरघर एखाद्याला आदराने प्रेमाने कसे वागवावे मग तो विद्यार्थी असो की कोणीही ही वागणूक फक्त तिथेच मिळणार. या सर्व खडतर व मेहनतीचा प्रवासाचा चीज झालं. खूप पारितोषिके मिळाली या पारितोषिकांच्या बदल्यात मी परिचारिकांच्या हॉस्टेल साठी बोरिंग, पाण्याची व्यवस्था, लायब्ररी करिता पुस्तके इत्यादी साहित्य शेवटी संस्थांकडून प्राप्त करून घेतले इसवी सन 2003 मध्ये महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची निवडणूक लढवली 2008 प्राचार्य पदावरून देखील निवडणूक लढवली. डॉ. मोमीन सांगतात दोन्ही वेळेस विजय प्राप्त झाला त्यांनी थोडे थोडके नव्हे तर 14 वर्षे महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल चे शिक्षण सभापती पद भूषविले. परिचारिकांना तितकी मदत करता येईल तितकी केली अगदी निस्वार्थपणे. आता एकच इच्छा राहिली होती डॉक्टर होण्याची ती पण डॉ. मोमीन यांनी वयाची सत्तरी व पीएचडी पुणे विद्यापीठाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली. डॉक्टर मोमीन आनंदाने सांगतात पीएचडी प्राप्त केल्यानंतर घरी पोहोचण्यापूर्वीच माझ्या पत्नी व मुलांनी माझा सत्कार सोहळा आयोजित केला होता तो डॉक्टर मोमीन यांच्या आयुष्यातला सुवर्णक्षण आहे असं म्हणता येईल जर त्यांच्या पतीचा व कुटुंबाचा पाठिंबा नसता तर हे अशक्यप्रय असे काम शक्य होऊ शकले नसते.

मातृभाषेतून मिळालेले ज्ञान उमगले फुलते या प्रेरणेतूनच त्यांच्यामधील लेखिका जागी झाली. जवळजवळ बारा विविध विषयांवरील पुस्तके प्रकाशित झाले आहेत हे यश डॉक्टर मोमीन यांच्या मते एकटीचे नाही तर त्यांच्या कुटुंबाचे, रुग्णांचे परिचारिकांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आणि प्रामुख्याने गुरूंचे आहे.

नवरात्र उत्सवानिमित्ताने अशा कर्तृत्वान नेतृत्व आणि कार्यास आधुनिक केसरीचा सलाम..!

# दृष्टिकोन बदला जीवन आपोआप बदलेल



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**दृष्टी जशी दृष्टीकोन तसा आणि जसा दृष्टीकोन तस जीवन आपल्या जीवनाचं एकंदरीत मुल्यमापन हे दृष्टीकोन कसा आहे यावर अवलंबून असते. जीवनाविषयी असणारा आपला दृष्टीकोन बदलायला शिका जीवन निश्चितपणे बदलल्याशिवाय राहणार नाही.जशी आपली दृष्टी तसं आपलं जीवन म्हणुन जीवन बदलायच असेल तर अगोदर दृष्टी बदल होणं अपेक्षित आहेच. शेवटी जीवन म्हणजे काय तर जन्म आणि मृत्यू या मधील खेळ किंवा प्रवास म्हणजे जीवन तसं पाहिलं तर जन्म आणि मृत्यू दोन्ही बाबी ह्या आपल्या अखत्यारीत येत नाहीत.**

किंवा त्यावर आपलं अधिकृत नियंत्रण नाही. तसेच हा प्रवास किती आहे हे पण निश्चित नाही हि अनिश्चितता फक्त आपल्याच बाबतीत नाही तर या सकल सृष्टी वरील कोणालाही अधिकृत याबात महित नाही. तरी पण प्रत्येक व्यक्तीला जीवनाच्या रंगमंचावर आपला अभिनय करणे हि करणे आहे. हा अभिनय करताना आपण आपला दृष्टीकोन दृष्टी जशी ठेवु तसं आपलं जीवन घडेल.जन्माला येताना खुप कमी प्रमाणात म्हणजे मोजके लोक फक्त सोन्याच्या चमचा तोंडात घेऊन जन्माला येत असतात सगळ्यांना असं भाग्य लाभत नाही. उर्वरित बहुसंख्य लोकांना जन्माला येताच संघर्ष हा पाचवीला पुजलेला असतो. पण आपण आपला जन्म गरीब किंवा श्रीमंत अशा कोणत्या कुटुंबामध्ये घ्यावा हे पण आपल्या हातात नाही. आपली दृष्टी, दृष्टीकोन, आणि कर्तृत्व यावर आपलं जीवन चांगले वाईट घडते. म्हणून जीवनात जीवन जगण्याची दृष्टी हि खूप महत्वाची आहे. तसेच जीवना कडे नेहमी आपण सकारात्मक पद्धतीने पाहिल पाहिजे .आपला दृष्टीकोन नेहमी सकारात्मक तसेच दुरदृष्टी जिद्द चिकाटी मेहनत यावर दृष्टीक्षेप ठेवणारा असला पाहिजे त्याच बरोबर जोडीला निरंतर प्रयत्न असले पाहिजेत जेणेकरून येणारे परिणाम सुद्धा योग्य येतील या मध्ये काही शंका नाही. जशी आपली दृष्टी असते तसं आपलं जीवन घडत असत. म्हणूनच आपली दृष्टी हि नेहमी सदैव सकारात्मक असेल तर आपलं जीवन सुखी समाधानी आनंदी होईल. या मध्ये शंका नाही आणि आपली दृष्टी सदैव नकारात्मक असेल तर आपलं जीवन दुःखी, वेदनादायी, चिंताग्रस्त होईल. म्हणून आपला दृष्टीकोन बदला आपलं जीवन नक्कीच बदलेल. पृथ्वी वर अनेक प्रकारचे प्राणी , सजीव , जीव अस्तित्वात आहेत. त्यापैकी मानव हा एकमेव विशेष प्राणी आहेकी ज्याचं सर्व जीवसृष्टी वर साम्राज्य निर्माण झाल आहे. मानवाने आपल्या तलक बुद्धी चातुर्याने सर्व जीव सृष्टीवर ताबा मिळवला आहे. परंतु या सगळ्या मध्ये प्रत्येक व्यक्ती ची समाजिक, आर्थिक, सैद्धान्तिक, बौद्धिक, गुणात्मक, परस्थिती एक सारखी नाही हे अगदी वास्तव आहे. तसं पाहिलं तर मानवी जीवन हे खूप मौल्यवान आहे. परंतु ते समजलं तर जाणल तर आणि म्हणूनच सगळ्यात महत्वाचे आहे. ते दृष्टीकोन योग्य ठेवलाच पाहिजे. आणि योग्य दृष्टीकोन ठेवला तर जीवन योग्यच असणार या मध्ये काही शंका नाही. म्हणून जीवन जगण्यासाठी आपली काय कल्पना आहे. संकल्पना आहे काय धेय्य आहे. काय उदेश आहे आणि जीवनाकडे आपण किती सकारात्मक दृष्टिकोनातून पाहतोय यावर जीवनातील विविध बाबी अंवलबुन असतात. आपण प्रत्येक गोष्ट बाब सकारात्मक पद्धतीने खेळाडू वृत्तीने घेतली पाहिजे. जीवनातील प्रत्येक बाबींकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन कसा आहे. हे खुप महत्वाचे आहे. म्हणून जीवन ज्ञान पुर्ण समाधान कारक पद्धतीने योग्य मार्गाने पुढे घेऊन जायचं असेल. तर आपल्याला आपला दृष्टीकोन बदलावा लागेल.तसेच आपण ज्या पद्धतीने जगाकडे पाहण्याचा प्रयत्न करणार त्याच पद्धतीने आपल्याला प्रतिक्रिया प्रतिसाद मिळणार म्हणून आपला दृष्टीकोन कसा आहे. यावर आपलं जीवन अंवलबुन आहे. आपलं जीवन सार्थकी लावायचे असेल तर सदैव सकारात्मक राहुन ज्ञान मार्गा वरून मार्गक्रमण करण उत्तम आणि मोह ,माया , स्वार्थ, भौतिक संसाधन ,या विषयी फार महत्वकांक्षा न बाळगता आपली जबाबदारी आपली कर्तव्य सद मार्गाने पुर्ण करण आणि सतत समाधानी असणं सदैव सकारात्मक दृष्टीकोन ठेवून मार्गक्रमण हितकारक आहे यासाठी आपली दृष्टी दृष्टीकोन सात्विक व समाधानी असला पाहिजे . सात्विक दृष्टीचा विकास होण्यासाठी अध्यात्माची कास धरली पाहिजे अध्यात्मिक ज्ञान मार्गाने मार्गक्रमण केल तर आपला जीवना विषयी असणारा दृष्टीकोन हळूहळू बदलत राहतो. जीवन बदलण्यासाठी प्रथम जीवना विषयी असणारा दृष्टीकोन बदलण अंत्यंत आवश्यक आणि गरजेचं असुन जीवन हितार्थ हा दृष्टिकोन फक्त आध्यत्मिक ज्ञान उंची वाढली तरच व्यवस्थित राहतो. म्हणजे जीवनाची दिशा आणि दशा बदलणार आध्यत्मिक हेच खरे संपदा आहे.

# कर्तव्य पालनाचा आनंद अवर्णनीय असतो...



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**दैनंदिन जीवन जगताना आणि उदरनिर्वाहासाठी रोजचे ठराविक काम करताना किंवा नोकरी करताना इतरही वेगवेगळे कर्तव्ये पार पाडायची असतात ,हे बहुदा बऱ्याच लोकांना माहीत नसते. आणि ज्यांना हे चांगले माहीत असते ते त्यांचे कर्तव्ये निष्ठेने पार पाडतात,आनंदी होतात आणि इतरांना आनंद देतात.भाजी मार्केट मध्ये भाज्या खरेदी करताना काही ग्राहक नेहमी भाव कमी करण्यासाठी भाजीवाल्या सोबत हुज्जत घालतात. परंतु हेच लोक मॉलमध्ये किंवा रेस्टॉरंटमध्ये पैसे उधळून येतात. शेतकऱ्यांचा भाजीपाला खरेदी करताना घासाघीस करायची नसते.**

उलट शेतकरी सांगेल तितक्या भावाने भाज्या खरेदी करणे हे ग्राहकांचे कर्तव्य असते. सार्वजनिक ठिकाणी वावरताना सरकारी मालमत्तेचे नुकसान न करणे,मोठ्या आवाजात न बोलणे, तेथे थुंकून व कचरा टाकून घाण न करणे,पर्यटनस्थळांचे सौंदर्य जपणे ही कर्तव्ये पार पाडल्याचा आनंद अवर्णनीय असतो. नोकरी निमित्त रोज प्रवास करताना बसमध्ये चांगले व वाईट अनुभव येतात. बसच्या प्रवास भाड्याचे तिकीट काढताना सगळे प्रवासी कंडक्टरला दोनशे किंवा पाचशेची नोट देतात.बिच्चारा कंडक्टर वैतागतो आणि 'सगळेजण मोठ्या नोटा देऊ नका सुटे पैसे द्या'असे सांगतो. तेव्हा मी आणि माझे मित्र कंडक्टरला तिकीटाचे सुटे पैसे देतो तेव्हा तो खूश होतो आणि प्रवास करताना नेहमी जवळ सुटे पैसे ठेवायचे कर्तव्य पार पाडल्याचा आनंद मिळतो.इतकेच नाही तर बसमध्ये नेहमीच गर्दी असते तेव्हा वृध्दांना, दिव्यांगांना व महिलांना आपली सीट देणारे प्रवासी मानवतेचे पुजारी ठरतात. प्रवास करताना आपला कोणाला धक्का लागणार नाही,आपल्या बसण्यामुळे बाजूच्या प्रवाशाला त्रास होणार नाही याची खबरदारी घेणे हे ही एक कर्तव्यच असते.

किरकोळ किंवा गंभीर आजारी असणारा नातेवाईक रुग्णालयात उपचार घेत असेल तर त्याला पाहण्यासाठी गेल्यावर असे लक्षात येते की रुग्णांचे नातेवाईक तिथला शिष्टाचार अजिबात पाळत नाहीत. मोठ्याने बोलतात,हसतात आणि खिदळतात.रुग्णाची आस्थेवाईक विचारपूस करायची असते हे ही त्यांना ठाऊक नसते.खरेतर आजारी व्यक्तीला किंवा त्याच्या नातेवाईकांना त्यावेळी आर्थिक मदतीची गरज असते.त्यांना अशा गरजेच्यावेळी नुसती सहानुभूती न दाखवता आर्थिक मदत करण्याचे कर्तव्य खरंच एक अवर्णनीय आनंद देऊन जाते. मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या अंत्ययात्रेला गेल्यावर वेगळे कटु अनुभव येत आहेत.नातेवाईकांचे सांत्वन करायचे सोडून,आलेल्या व्यक्ती घोळक्यात बसून मोठ्याने गप्पा मारतात,खळखळून हसतात. असे न करता शांत राहून, नातेवाईकांना मानसिक आधार देण्याचे कर्तव्य त्यावेळी पार पाडणे अत्यंत गरजेचे असते.कमावत्या मुलांनी विभक्त न राहता वृध्द आईवडिलांना जीवापाड जपावे, बहिणभावांना जीव लावावा,सण उत्सव एकत्र येऊन साजरे करावेत. मनसोक्त गप्पा माराव्यात,पंगतीत एकत्र बसवून रच्चून जेवावे, एकमेकांना आग्रह करत मेजवानी वर ताव मारावा.त्यामुळे निखळ जीवनाचा खरा आनंद मिळतो. कौटुंबिक वात्सल्य जपण्याचे कर्तव्य पार पाडत राहणे काळाची गरज बनली आहे.सुखदुःखात एकत्र राहून एकमेकांना मानसिक आधार दिल्याने आलेली संकटे लिलया पेलले जातात.श्रीमंतांच्या मुलांमुलींच्या लग्नाला तर सगळेच जातात पण गरीबांच्या वा शेतकऱ्यांच्या मुलांमुलींच्या लग्नाला आवर्जून जावे. कारण तेथे जो मानसन्मान मिळतो तो आनंददायी असतो आणि जेवणात मोजकेच अन्न पदार्थ असतात परंतु रुचकर आणि भरपेट असतात. अशी ही नमूद काही कर्तव्ये वेळोवळी आपण पार पाडत गेलो तर खरेखुरे आनंदी जीवन जगल्याचा आनंद मिळेल.जाता जाता सर्वांना एक अतिशय महत्त्वाचे कर्तव्य पार पाडण्याचा सल्ला द्यावा वाटतो- आपण सगळ्यांनी मिळून पर्यावरणप्रेमी होऊ या,जमतील तेवढी जमेल तेथे मोकळ्या जागेत झाडेच झाडे लावू या... आणि लावलेल्या झाडांचे रक्षण व संवर्धन करुया... झाडांनाही जीवापाड जपू या...




# दिशाभूल करणाऱ्या उद्धव ठाकरे, शरद पवारांनी माफी मागावी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मविआ आघाडी सत्तेत असताना राज्य सरकारची नोकरभरती कंत्राटी पद्धतीने करणाऱ्या उद्धव ठाकरे आणि त्यांना पाठिंबा देणारे शरद पवार यांनी राज्यातल्या तरुणांची दिशाभूल केली असून याबद्दल त्यांनी महाराष्ट्राची नाक घासून माफी मागावी, या मागणीसाठी भारतीय जनता पार्टीतर्फे शनिवारी राज्यभर आंदोलन करण्यात आले. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे , प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ, संजय केनेकर, माधवी नाईक, खा. प्रताप पाटील चिखलीकर, खा. धनंजय महाडिक, आ. प्रवीण पोटे पाटील, आ. प्रवीण दरेकर, आ. निरंजन डावखरे, मुंबई सरचिटणीस संजय उपाध्याय यांच्यासह पक्षाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन कंत्राटी नोकर भरतीचा पहिला निर्णय काँग्रेस - राष्ट्रवादी सरकारच्या काळात २००३ मध्ये घेण्यात आला असल्याचे पुरावे दिले होते. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना मविआ आघाडी सरकारच्या काळात कंत्राटी नोकर भरतीचा शासकीय निर्णय कसा झाला याची सविस्तर माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कागदपत्रे सादर करून दिली होती. कंत्राटी भरतीचे पाप १०० टक्के उबाठा, काँग्रेस आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस यांचेच आहे. आता त्यांनी महाराष्ट्राच्या जनतेची माफी मागावी, त्यांनी ती न मागितल्यास आम्ही त्यांना जनतेत उघडे पाडू, असा इशाराही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला होता. त्यानुसार प्रदेश भारतीय जनता पार्टीतर्फे शनिवारी राज्यभर उद्धव ठाकरे, शरद पवार आणि काँग्रेसच्या विरोधात आंदोलन करण्यात आले. नागपूर येथील आंदोलनात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे सहभागी झाले होते. मुंबईत गिरगाव येथे झालेल्या आंदोलनात विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर, मुंबई सरचिटणीस संजय उपाध्याय, शरद चिंतनकर, माजी आमदार अतुल शहा, पुणे येथील आंदोलनात प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, माजी मंत्री दिलीप कांबळे, प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ, शहराध्यक्ष धीरज घाटे , ठाणे येथील आंदोलनात आ. निरंजन डावखरे, शहराध्यक्ष संजय वाघुले, नांदेड येथील आंदोलनात खा. प्रताप पाटील चिखलीकर, कोल्हापूर येथील आंदोलनात खा. धनंजय महाडिक, महेश जाधव, छत्रपती संभाजीनगर येथे आंदोलनात प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर, शहराध्यक्ष शिरीष बोराळकर आदी सहभागी झाले होते.




## वैजापुरात पोलीस स्मृती दिनानिमित्त शहीद जवानांना आदरांजली

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** २१ऑक्टोबर,१९५९ रोजी सीआरपीएफचे सैनिक जवान भारतीय सीमेचे रक्षण करताना चिनी हल्ल्यात शहीद झाले. त्यांचे हौतात्म्य देश वाशी कधीच विसरणार नाही असे वक्तव्य सहाय्यक पोलीस अधिक्षिका आयपीएस अधिकारी श्रीमती महक स्वामी यांनी व्यक्त करून या दहा शहीदाना व १९५९पासून आजपर्यत सीमा सुरक्षा दल, पोलीस दल व इतर सर्व विभागात शहीद झालेल्या जवानांना शनिवार रोजी आयोजित "पोलीस स्मृती दिनी"आदरांजली अर्पण केली. या कार्यक्रमात पोलीस निरीक्षक श्यामसुंदर कौठाळे, यांनीही श्रद्धांजली वाहिली. आरंभी शहीद जवानांना शांत उभे राहून




आदरांजली अर्पण करण्यात आली. प्रास्ताविक अध्यक्ष गौतम गायकवाड यांनी केले. या प्रसंगी से.नि.पोलीस अधिकारी सोपानराव निकम, बबन क्षीरसागर, अशोक आप्पा पवार, से.नि. जवान सोपान गाढे, रतीलाल गायकवाड, महेश भालेराव, जवान संतोष साठे, बसवेकर, दत्तात्रय पवार यांच्यासह अशोक गायकवाड, सुमन गायकवाड, सीता मावशी गायकवाड, रुखमन गायकवाड, ऋत्विक गायकवाड, बागुल यांच्या सह शहरातील नागरिक उपस्थित होते.

## पैठण येथील कन्या शाळेस सी.सी.टी.व्ही. भेट

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथील कन्या शाळेत आता सीसी टिव्हीची नजर आसणार आहे. स्त्री शक्तीचा जागर करत नवरात्रीच्या निमित्ताने मुलींच्या सुरक्षेच्या अनुसंगाने पैठण येथिल व्यापारी महासंघाच्या वतीने ८ CCTV संच तसेच रोटरी क्लबच्या अध्यक्षा सखुबाई झारगड यांच्यातर्फे टि.व्ही. संच भेट दिला असुन शाळा परिसरात सीसीटिव्हीची नजर आसणार आहे याचे लोकार्पण रेणुका देवी साखर कारखान्याचे चेअरमन विलास भुमरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नंदलाल काळे, या प्रसंगी पैठण शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहिया, सचिव बलराम लोळगे, सुनिल नलभे, सचिन लखोटीया,अमोल धस, हार्दिक सराफ, योगेश लोहिया, उमेश तट्टू,सचिन उंडाळे, बाळासाहेब आहेर, लक्ष्मण लबडे,जगदिश लोहिया,सचिन पहाडे, मधुसूदन मुंदडा, राधाकिसन लोहिया,जगदिश नागोरी, राहुल पहाडे, प्रविण उदावंत,स्वदेश पांडे, आनंद लोहिया,



सचिन तांदळे,मुकेश पंजवानी आदी व्यापारी उपस्थित होते. मुख्याध्यापक झारगड, मिटकर सर, सरोदे सर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व व्यापारी महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## इनरव्हील क्लकडून 749 विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय आणि इनरव्हील क्लब, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने श्रेयनगर येथील श्रेयस बालक मंदिर, प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालय येथे "भव्य रक्त गट तपासणी शिबीर" आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन श्रेयस शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्षा सौ. सुषमा मुळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून इनरव्हील क्लब, छत्रपती संभाजीनगर अध्यक्षा डॉ. इना नाथ, प्रोजेक्ट मॅनेजर सौ. लता मुळे आणि डॉ. जयश्री देशमुख, डॉ. लता काळे उपस्थित होत्या.

यावेळी प्रोजेक्ट मॅनेजर सौ. लता मुळे यांनी या शिबिरासाठी पुढाकार घेऊन मार्गदर्शन



करताना सांगितले की आपले आरोग्य चांगले असेल तरच आपण कोणतेही कार्य व्यवस्थित करू शकतो. त्यामुळे सर्वांनी आपल्या स्वतःचा आणि समाजातील सर्व दुर्बल घटकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या रक्तगट माहीत असणे फार आवश्यक आहे. गरजू विद्यार्थ्यांना निरोगी आणि सशक्त जीवन जगता यावे, म्हून अशा प्रकारचे आरोग्य शिबीर सात्यताने आयोजित करण्यात येतील, गरजू विद्यार्थ्यांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात, हा इनरव्हील क्लब, छत्रपती संभाजीनगरचा मानस आणि निर्धार आहे.

विद्यार्थ्यांना रक्तगट म्हणजे काय ! त्याचे प्रकार, हिमोग्लोबिनची शरीराला असलेले आवश्यकता, ते किती प्रमाणात शरीरात असावे. या तपासणीची प्रक्रिया कशी केली जाते. कोणती सोल्यूशन्स वापरली जातात. याची सर्व माहिती विद्यार्थ्यांना या तपासणी शिबिराद्वारे देण्यात आली. CSMSS येथील तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत या रक्तगट तपासणी शिबिरात इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतच्या एकूण 749 विद्यार्थ्यांची रक्त तपासणी करून रक्तगटाची नोंदणी करून त्यांना रक्तगट कार्ड देण्यात आले.

शिबिराच्या निमित्ताने इनरव्हील क्लब, छत्रपती संभाजीनगरच्या सदस्या सुनंदा पाटील यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी बालऊपयोगी व बाल साहित्यांची १०० पुस्तके भेट म्हणून देण्यात आलेत. यावेळी मुख्याधिपिका शैला धुमाळ, श्वेता पवार, इनरव्हील क्लब, छत्रपती संभाजीनगर सचिव विजया नानकर, माधुरी अहिरराव, मंगल चव्हाण, सुनंदा पाटील, डॉ. दिपाली आमले, डॉ. अविनाश देशमुख, डॉ. माधवी गायकवाड, डॉ. शुभांगी मराठे, डॉ. नरेश निंबाळकर, डॉ. नवीन शाहू आणि श्रेयस बालक मंदिर आणि माध्यमिक विद्यालयाची शिक्षक, विभागप्रमुख आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.



# शेतकऱ्यांची कापसाला पाणी भरणी व फवारणीची लगबग

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात सर्कल तथा मंडळ मधे सद्या शेतकऱ्यांची कापसाला पाणी भरणी व औषध फवारणी कामाची लगबग दिसून येत आहे. यंदा पावसाअभावी कापुस उत्पादनात घट होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. कारण पावसाअभावी कापुस पिकांची वाढ झाली नाही. तर फुले कैऱ्या ची वाढही दिसून येत नाही. पावसाळ्याचे यंदा जेमतेम पाऊस त्यात परतीचा व बेमौसमी पाऊसही नाही.पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी म्हणजे पन्नास टक्के ही पाऊस न झाल्याने ओढे नाले नदी तलाव ला पाणी नाही. तर त्यामुळे विहिरींना पाणी वाढले नाही. त्यामुळे खरिप पिके जेमतेम पावसावर तग धरून होती तर खरिप पिकांतील कापसाला पाण्याची गरज निर्माण झाली आहे.शेतकऱ्या जमेल तसे पाणी देण्याचा धडाका लावला आहे. परंतु त्यात ऑक्टोबर महिन्यात मरनाचा उन्ह पडत असल्याने पाणी भरण्यात व्यत्यय येत आहे. मात्र कापुस पिकाला पाण्याची गरज निर्माण झाल्याने सद्या पाणी भरण्याची लगबग सुरू असुन औषधी फवारणी शेतकऱ्यांनी हाती घेतले आहे. तसे कापसाची ऐवढी कामे करुनही भाव काय मिळणार उत्पादन किती होणार खर्च निघेल का एक ना अनेक प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे.

# चंद्रपूर महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** २१ ऑक्टोबर २०२३: राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग नवी दिल्लीचे सदस्य मा.डॉ. पी.पी. वावा यांच्या अध्यक्षतेखाली आज २१ ऑक्टोबर रोजी चंद्रपूर महानगरपालिका राणी हिराई सभागृह येथे सफाई कर्मचारी यांच्या विविध विषयांवर आढावा बैठक आयोजीत करण्यात आली होती. यावेळी सफाई कर्मचाऱ्यांनी त्यांच्या समस्या मांडल्या. या समस्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन डॉ.वावा यांनी दिले. या बैठकीस डॉ.वावा यांच्यासह मनपा आयुक्त विपीन पालीवाल, जिल्हा प्रशासन अधिकारी अजितकुमार डोके, सर्व नगर परिषद यांचे मुख्याधिकारी, उपायुक्त श्री.अशोक गराटे, उपायुक्त मंगेश खवले,शहर अभियंता श्री. अनिल घुमडे तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थीत होते. दरम्यान, मनपा आयुक्त विपिन पालीवाल यांनी डॉ. वावा यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.बैठकीत डॉ.वावा यांनी सफाई कर्मचाऱ्यांचे कामाचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, सफाई कर्मचारी हे शहराचे रक्षक आहेत. त्यांचे काम अतिशय महत्वाचे आहे. त्यांना सन्मानाने वागवले पाहिजे. यावेळी डॉ. वावा यांनी सांगितले की, समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला जाईल. विविध योजना राबवून मुख्य प्रवाहात आणले जाईल. बैठकीमुळे सफाई कर्मचाऱ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले आहे.

# डोंबिवलीतील गावदेवी मंदिरात दोन गटात राडा

आधुनिक केसरी न्यूज

**डोंबिवली :** येथील आयरे तुकारामनगर भागातील गावदेवी मंदिरात शुक्रवारी रात्री देवीच्या दर्शनासाठी आलेल्या स्थानिकांना याच भागातील १५ जणांनी दगडांचा मारा, धारदार हत्यारांचे वार करत गंभीर जखमी केले. पूर्व वैमनस्यातून हा वाद झाल्याचे पोलिसांनी सांगितले. या हल्ल्यात व्यावसायिक ओंकार श्रीराम भगत (२७) आणि त्याचे मित्र गंभीर जखमी झाले आहेत. ओंकारच्या तक्रारीवरून पोलिसांनी सचीन केणे, नरेंद्र जाधव, गौरव जुळवे, अखिलेश धुळप, वरूण शेट्टी, योगेश सुर्वे, नितीन यादव, गौरव फडके आणि इतर १५ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.

# शब्द शंकरपाळी दिवाळी विशेषांक २०२२ ला सर्वोत्कृष्ट दिवाळी अंकाचा पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पाटण तालुक्यातील डाकेवाडी (काळगांव) येथील स्पंदन चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यावतीने कला, सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, वैद्यकीय, उद्योग, कृषी व क्रीडा अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था, मंडळे यांना राज्यस्तरीय प्राईड ऑफ स्पंदन अवॉर्ड देवून गौरवण्यात आले. त्यापैकी दिवाळी अंक स्पर्धेत शब्द शंकरपाळी दिवाळी विशेषांक २०२२ ला सर्वोत्कृष्ट दिवाळी अंकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरुप सन्मानचिन्ह,मानपत्र, ग्रंथ आणि कोल्हापूरी फेटा असे होते. सदर पुरस्कार स्वीकारण्यासाठी संस्थेचे प्रतिनिधि श्रीगणेश शेंडे उपस्थित राहिले आणि पुरस्कार स्वीकारला. या पुरस्कारामुळे संपादक भूषण सहदेव तांबे सहसंपादिका अवंतिका महाडिक, आरती सशीतल आणि सर्व सहभागी सदस्यांचे मनोबल वाढले आणि पुढील साहित्यिक वाटचालीसाठी प्रोत्साहन मिळाले. शब्द शंकरपाळी दिवाळी विशेषांक २०२२ या अंकाला "सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक" जाहीर झाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

२०२२ मधील पुरस्काराची घोषणा ट्रस्टचे डॉ.संदीप डाकवे यांनी केली आहे. यावेळी ट्रस्टचे उपाध्यक्ष आप्पासोा निवडूंगे, सचिव सौ.रेश्मा डाकवे व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. दिवाळी अंक स्पर्धेसाठी संपूर्ण महाराष्ट्रातुन प्रवेशिका मागवल्या होत्या. सुमारे २०० दिवाळी अंकातून या अंकाची निवड करण्यात आली. या पुरस्कारांचे वितरण शनिवार दि. २१ ऑक्टोबर, २०२३ रोजी सकाळी १० वाजता यशवंतराव चव्हण स्मृती सदन (टाऊन हॉल) कराड, ता.कराड, जि.सातारा येथे संपन्न झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध व्याख्याते आणि लेखक प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे, बिग बॉस फेम अभिनेते किरण माने, महाराष्ट्र केसरी पै.आप्पासाहेब कदम, प्रा.ए.बी. कणसे, कृष्णाकाठ न्यूज नेटवर्क चे चंद्रकांत चव्हाण, लिम्का बुक ऑफ होल्डर डॉ.राजेंद्र कंटक, ह.भ.प.विजय महाराज, अभिनेता, लेखक सचिन पाटील, अभिनेत्री प्राजक्ता शिसोदे, अभिनेते नितीन गवळी, टीव्ही अँकर स्वाती गोडसे, अभिनेत्री डॉ. सीमा पाटील, अभिनेता प्रशांत बोगदार, डॉ.संदीप डाकवे व अन्य मान्यवर उपस्थित होते.




गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# वेलनेस सेंटरच्या माध्यमातून रुग्णसेवेकरिता प्रयत्न करणार

## राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांनी दिले आश्वासन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर शहरात केंद्रीय कर्मचारी व सेवानिवृत्तांकरीता वेलनेस सेंटरला मंजुरी मिळाली यासाठी माननिय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व तत्कालीन तसेच विद्यमान केंद्रीय आरोग्य मंत्री स्तरावरुन सहकार्य लाभले मात्र या दरम्यान अनेक अडचणी उद्भवल्यानंतरही अखेरीस हे CGHS वेलनेस सेंटर रुग्णसेवेत रुजू होवून आज वर्षपूर्ती वर्धापन सोहळा साजरा होत आहे ही आनंदाची बाब असून या सेंटरच्या माध्यमातून रुग्णांना प्रभावी सेवा मिळण्याकरीता अडचणी दूर करुन विविध सेवा उपलब्ध करण्याकरीता प्रयत्न करण्याचे आश्वासन राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी दिले. चंद्रपूरातील रेल्वेस्थानक परिसरात गतवर्षी ऑक्टोंबर 2022 मध्ये प्रारंभ झालेल्या या वेलनेस सेंटर च्या प्रथम वर्धापन सोहळ्यानिमित्त दि. 21 ऑक्टोंबर रोजी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन हंसराज अहीर मार्गदर्शन करीत होते. या कार्यक्रमास CGHS च्या अतिरिक्त संचालक डॉ. विजया मोटघरे, चंद्रपूरच्या CGHS इनचार्ज डॉ. ममता आदेवार, जॉइंट सेक्रेटरी सुरेश डोरले, माजी न.प. उपाध्यक्ष अनिल फुलझेले, भाजपा जिल्हा महामंत्री रविंद्र गुरनूले, पेन्शनर असोसिएशनचे सचिव सुरेश धानोरकर आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. यावेळी बोलतांना हंसराज अहीर यांनी चंद्रपूरातील या CGHS वेलनेस सेंटर स्थापनेतील अडचणीबाबत माहिती देत बिल्डिंग व स्टाफ नियुक्ती पर्यंतच्या पाठपुराव्याबाबत केलेल्या प्रयत्नांची माहिती उपस्थितांना दिली. या वेलनेस सेंटरमधून उपचार करणाऱ्या केंद्रीय कर्मचारी व सेवानिवृत्त बांधवांना प्रभावी उपचार मिळण्याकरीता ज्या काही अडचणी उद्भवल्या आहेत. त्या सोडविण्याकरीता निश्चितपणे प्रयत्न करु असे आश्वस्त दिले. खाजगी डॉक्टर्सच्या सेवा उपलब्ध होण्यासाठी तसेच औषधांची कमतरता भासणार नाही याबाबतही आपण लक्ष घालू असे अहीर यांनी उपस्थितांना सांगितले. यावेळी डॉ. विजया मोटघरे यांनी CGHS वेलनेस सेंटर व्दारा केलेल्या मागण्यांबाबत वरीष्ठ स्तरावर पाठपुरावा करुन आरोग्य सेवेत उद्भवणाऱ्या अडचणी दुर करण्याचा प्रयत्न केला जाईल असे सांगितले. यावेळी डॉ. ममता आदेवार, सुरेश डोरले यांनीही वर्धापन प्रसंगी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पेन्शनर्स असोसिएशनचे सचिव सुरेश धानोरकर यांनी केले. या कार्यक्रमास CGHS चे अंशुमन जावडेकर, सिंह तसेच मनोहर साळवे शंकरराव






# पंतप्रधानांवरील टीका खपवून घेणार नाही : केंद्रीय मंत्री राणे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर इस्रायल व हमास मुद्द्यावरून चुकीची टीका केली तर सहन करणार नाही, त्याला जशास तसे उत्तर दिले जाईल असा खणखणीत इशारा केंद्रीय सूक्ष्म, लघु और मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांना गुरुवारी दिला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रवक्ता गणेश हाके, ओमप्रकाश चौहान यावेळी उपस्थित होते. पंतप्रधान मोदी यांनी इस्रायल- हमास संघर्षात एकंदरीत दहशतवाद विरोधी भूमिका मांडली. मात्र त्यावरून पंतप्रधान इस्रायल ला पाठिंबा देत असल्याचा चुकीचा समज पसरवण्याचा नाहक प्रयत्न पवार यांनी केल्याचे श्री. राणे यांनी नमूद केले.

राणे म्हणाले की श्री. पवार हे एकीकडे पॅलेस्टाईनची बाजू घेत आहेत आणि इस्रायलची बाजू घेतली म्हणून पंतप्रधानांवर बिनबुडाची टीका करीत आहेत. श्री. पवार यांनी केंद्रात देशात आणि राज्यात अनेक महत्वाची पदं भूषवली आहेत. चार वेळा ते मुख्यमंत्री होते. मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत पवार यांनी मार्च १९९३ च्या साखळी बॉम्बस्फोटादरम्यान मशिदीमध्येही बॉम्बस्फोट झाला असे हेतुपूर्वक असत्य कथन केले होते. एका विशिष्ट समाजाच्या तुष्टीकरण साठी मुख्यमंत्रीपदावरील व्यक्तीने राजकीय हेतू ठेवून असं खोटं बोलणं हे देशहिताच्या विरोधात होते. पवार हे देश प्रथम अशी भूमिका कधी घेणार असा सवाल ही राणे यांनी केला. केंद्र सरकारनं जुलै 1993 मध्ये नेमलेल्या एन.एन.व्होरा यांच्या समितीने दाऊद आणि मेमन टोळीचे राजकारण्यांशी असलेल्या जवळकीच्या संबंधांबाबत आपल्या अहवालात काँग्रेसच्या अनेक नेत्यांच्या नावाचा उल्लेख केला होता. व्होरा समितीच्या अहवालात दाऊदशी संबंध असलेल्या काँग्रेसच्या नेत्यांचा उल्लेख आहे, हे पवार यांना ठाऊक हेते. मात्र त्याबाबत पवार यांनी चकार शब्द काढला नाही अशी टीका राणे यांनी केली. पवार यांनी कधीतरी चांगल्याला चांगले म्हणावे व मोदी सरकारने मागच्या ९ वर्षांत आणलेल्या ५५ योजनांचे कधीतरी कौतुक करावे असा सल्लाही राणे यांनी दिला.

# नंदी फाउंडेशन तर्फे माध्यमिक विद्यालयच्या विद्यार्थिनींना विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** जनता सेवा मंडळ, नाशिक संचलित माध्यमिक विद्यालय धामणगाव, ता. इगतपुरी, जि.नाशिक या विद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावीच्या सर्व विद्यार्थिनींना नांदी फाउंडेशन या संस्थेच्या वतीने "नन्ही कली" या उपक्रमांतर्गत विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.एस.एस.आव्हाड सर व सामाजिक कार्यकर्ते-पत्रकार राजू गाढवे यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये स्कूल बॅग, कंपासपेटी, पाऊच, आठ वह्या, पाच पेन, स्वेटर, सॅनिटरी नॅपकिन इत्यादी वस्तूंचे वाटप करण्यात आले. सुदाम खैरनार, नितीन इंगळे, संजय नागमोती, श्री.समाधान गरुड, गोरख लहामगे, दिपक उगले, श्रीमती जयश्री पुंड, श्रीमती संगिता कदम, श्रीमती दिपाली जाधव, श्रीमती रेखा शिरसाठ, अविनाश आहिरे, श्री.मुरलीधर देवरे, संजय पवळे, अनिल देशमुख व नन्ही कली उपक्रमाच्या मार्गदर्शक शिक्षिका श्रीमती सुजाता भांबेरे, कु.आश्विनी नागरे, कु.हर्षदा वाकचौरे व विद्यालयातील सर्व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. मुख्याध्यापक एस. एस. आव्हाड सर व राजूभाऊ गाढवे यांनी आपल्या मनोगतातून नांदी फाउंडेशनचे आभार मानले व विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. सूत्रसंचलन नितीन इंगळे यांनी केले व आभार समाधान गरुड यांनी केले.



# वडवाळी ग्रामपंचायत सरपंच पदासाठी १० तर सदस्य पदासाठी ३१ नामनिर्देशन पत्र दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** ग्रामपंचायतींच्या (सदस्य पदासह " थेट सरपंच पदाच्या) सार्वत्रिक निवडणूकांसाठी पैठण तालुक्यातील वडवाळी ग्रामपंचायत निवडणूकीत जनतेतुन निवडल्या जाणार्या सरपंच पदासाठी शेवटच्या दिवशी १० नामनिर्देशन पत्र दाखल झाले असुन सदस्य पदासाठी ३१ नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आल्याची माहिती निवडणूक विभातुन देण्यात आली आहे. नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दि. २३ ऑक्टोबरला नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक २५, निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक २५, आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक ५ नोव्हेंबर मतमोजणी व निकाल घोषित करण्याचा दिनांक ६ नोव्हेंबरवडवाळी येथे बालाजीचा मोठा लळीतोत्सव आसतो नेमकी ग्रामपंचायत निवडणूक ही याच काळात आल्याने ग्रामपंचायत निवडणूकीत रस पाहायला मिळणार असुन याकडे पैठण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# बालई काळाधोंडा येथील तोडक कारवाई सिडकोने थांबवावी

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** बालई-काळाधोंडा ग्रामविकास परिषदेच्या मूळ गावठाण २ एकर आणि विस्तारित गावठाण १२० एकर एकूण १२२ एकर क्षेत्रांतील ११११ घरे, व्यावसायिक गाळे दुकाने सार्वजनिक वापरांतील जागा येथील ओबीसी, (एससी, एसटी) मागासवर्गीय, लोकसंख्येच्या (२६९७) लोकांच्या घरे दुकाने यांना अनाधिकृत बांधकामे म्हणून पाठविलेल्या नोटीस संविधानाच्या आर्टीकल २१ नुसार स्थगित करुन प्रास्तावित गावठाण प्रस्ताव महसूल विभाग, भूमी अभिलेख विभाग प्रॉपर्टीकार्ड मिळण्याच्या सरकारी तसेच न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत १२२ एकर विस्तारित गावठाणांतील सर्व मालकांना सुरक्षा देऊन तोडक कारवाई थांबविणे बाबत बालई काळाधोंडा ग्रामविकास परिषदेमार्फत सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक, नियंत्रक अनधिकृत बांधकामे (दक्षिण ) विभाग सिबिडी बेलापूर, नवी मुंबई येथे पत्रव्यवहार करण्यात आला आहे. गावठाण विस्तार संदर्भात प्रॉपर्टी कार्ड मिळण्याच्या सरकारी तसेच न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत १२२ एकर विस्तारित गावठाणतील सर्व मालकांना सुरक्षा देऊन तोडक कारवाई थांबण्याची मागणी बालई काळाधोंडा ग्रामविकास परिषदेने व्यवस्थापकीय संचालक सिडको प्रशासन व नियंत्रक अनधिकृत बांधकामे (दक्षिण) विभागाकडे केली आहे. १९३२च्या इंग्रज कालीन सर्वे नुसार मूळ गावठाणांचे नकाशे आहेत. बालई-काळाधोंडा हे गावठाण मूळ केवळ २ एकर आहे. नैसर्गिक लोकसंख्या वाढीवनुसार मुळ गावठाण हे १९७० सिडको भूसंपादना नंतर आता (१) १९७० ते १९८० (२) १९८० ते १९९० (३) १९९० ते २००० (४) २००० ते २०१० (५) २०१० ते २०२०, पाच दशकानंतर प्रत्येकीची २०० मीटरने पाच पट १००० मीटरने वाढली पाहिजे.मात्र तसे झाले नाही.मागच्या काळात महाविकास आघाडी सरकारने २५० मीटर क्षेत्रातील घरे भाडेपट्यांने देणे ही मूळ जमीन मालकांची घोर फसवणूक आहे. गावठाण एका बाजूने ५० मीटर तर काही बाजूने १ किलोमीटर १००० मीटर पेक्षा पुढे वाढलेले आहे. त्यामुळे सदरील योजना म्हणजे गावठाण विस्तार योजना नाही ती आम्हांस मान्य नाही.असे बालई काळाधोंडा ग्रामविकास परिषदेच्या पदाधिकारी सदस्य यांचे मत असून सिडकोच्या या गलथान कारभारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. गावठाण प्रस्ताव - गावठाण विस्तार हा ग्रामपंचायत अधिनियम १९६७, ओबीसी, (एससी, एसटी) घरे गावठाण हक्क १९८३ प्रॉपर्टीकार्ड कायदा, स्वामित्व योजना या सिडको स्थापनेच्या अगोदर पासून अस्तित्वातील महसुल गावठाण योजना भारतीय संविधानातील आर्टीकल ४० ग्रामपंचायत संघटन या तत्वानुसार आहे. त्यामुळे तो प्रस्ताव एकूण १२२ एकर घरांची संख्या ११११ तर लोकसंख्या २६९७ ही शासनाला माहितीस्तव नकाशा सहित सादर करण्यात आली आहे. हा प्रस्ताव मंजूर होईपर्यंत सिडकोने बालई काळाधोंडा कोणत्याही घरास नोटीस पाठवून तोडक कारवाई करावयाची झाल्यास सिडको प्रशासनाने तसेच अतिक्रमण विभागाने बालई-काळाधोंडा ग्रामविकास परिषदेस त्वरीत कळवावे.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444

डॉ. के.बी. हिवराळे

आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ

B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद